नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ४९ * * अकोला * बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आशिया कप : भारतीय क्रिकेट संघाची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
टी-२० आशिया कपसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी मंगळवारी संघाची घोषणा केली. सूर्यकुमार यादव संघाचे नेतृत्व करेल, तर भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिललाही स्थान मिळाले आहे.

संघात अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, रिंकू सिंग, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, शिवम दुबे, जसप्रित बुमराह, कुलदीप यादव, हर्षित राणा, वरूण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग यांचा समावेश आहे. क्रिकेट आशिया कप ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये सुरू होत आहे. भारत या स्पर्धेचे यजमान आहे. टीम इंडियाचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध असेल.

# मुसळधार पावसाचे १२ बळी

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## बँकांची तूट, जनतेची लूट

गेल्या पाच-सात वर्षांपासून अमुक तमुक एका मोठ्या भांडवलदाराच्या घेतलेल्या कर्जाला बँकेने माफ केले, हे आपण वाचतो आणि ऐकतो. सामान्य माणसावर दहावीस हजार रुपयांचे कर्ज असले तरी बँका काय करतात आणि काय काय करीत नाहीत ते आपण दररोज वर्तमानपत्रात वाचतो आणि टीव्हीवर बघतो. आपल्या सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना जाहीर केलेली आहे पण ती अजून प्रत्यक्षात उतरलीच नाही. वास्तविक ही कर्जमाफी ज्या ज्या बँकेने कर्ज दिलेले आहे त्याच बँकेने केली पाहिजे. या कर्जमाफीसाठी खरे तर सरकारला पैसा देण्याची गरज भासू नये. तुम्ही एकेका उद्योगपतीचे ५० हजार कोटी, ७०००० कोटी, ८० हजार कोटी एवढ्या मोठ्या रकमेची कर्जे माफ करता तेव्हा त्यांची भरपाई बँका कशा प्रकारे करतात. हे पाहिले तर अर्वाचीन काळात बँकांनी अत्यंत वेगवेगळ्या मार्गाने वसुलीचा अक्षरशा धुमधडाका लावलेला आहे हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. या प्रकारातील सगळ्या गोष्टी पाहिल्या तर आपले म्हणजेच सर्वसामान्यांचे डोळेच पांढरे होतील. बँका यापूर्वी रोख रकमेचा व्यवहार करण्यासाठी कोणतीही रक्कम किंवा शुल्क आकारीत नसत. आता अनेक बँका रोख रक्कम मोजण्यासाठी त्याचे शुल्क आकारतात त्यातही आता पैसे मोजण्यासाठी कॅशियरला काहीही करण्याची गरज नसते. दोन-चार लाखांच्या नोटा मशीनमध्ये पाच ते सात मिनिटांमध्ये मोजल्या जातात आणि व्यवहार पूर्ण होतो. मग त्यासाठी भरमसाठ शुल्क आकारणे कितपत योग्य आहे हा एकच प्रश्न नाही, अख्खी प्रश्नावली तयार आहे. तुमचे बँकेत खाते आहे त्यासाठी दरवर्षी वेगळे शुल्क आकारले जाते. एटीएम वापरून महिन्याभरात चार ते पाच वेळा पैसे काढता येतात नंतर प्रत्येक व्यवहाराला वेगळे शुल्क याच बँक आकारत असतात. डुप्लिकेट पासबुक पाहिजे त्याला वेगळे शुल्क, स्टेटमेंट हवे आहे त्याला वेगळे शुल्क, तुम्ही दिलेला किंवा तुम्हाला मिळालेला चेक जर पास झाला नाही, तर त्यालाही दोन्ही कडून जबर शुल्क वसूल केले जाते. याशिवायही इतर अनेक माध्यमातून बँका मस्तपैकी सध्याच्या कालावधीमध्ये वसुली करतात. सध्या ऑनलाईन पेमेंटचा जो मार्ग बरेच लोक अवलंबतात त्याच्यामध्ये मोबाईल रिचार्ज करण्याला सुद्धा प्लॅटफॉर्म म्हणजेच व्यावसायिक दर आकारून त्यातूनही वसुली होतच असते. ही वसुली इंटरनेट उपलब्ध करून देणारे पुरवठाधारक करतात असे दिसले तरी त्यातील काही भाग हा बँकांकडे वळता केला जातो, ही यामधील खरी मेख आहे. तसे नसते तर रिझर्व बँकेने यापुढे शून्य आकारणीवर कोणताही प्लॅटफॉर्म चालू ठेवला जाऊ शकत नाही, असे स्पष्टीकरण दिलेच नसते. ती बातमी तर जगजाहीर आहे. त्यावर अजून वर्तमानात वरताण म्हणजे तुमच्या खात्यात किमान शिल्लक नाही म्हणूनही दंड आकारला जातो. सर्वसामान्यांच्या खिशात चाट लावून एवढी वसुली करून त्याचा फायदा कोणाला होतो. तर आम्ही वर म्हटल्याप्रमाणे कर्जबुडव्या उद्योगपतींना होतो. एके काळी व्हिडिओकॉन नावाची कंपनी प्रसिद्ध होती. आयसीआयसीआय बँकेच्या महाव्यवस्थापक चंदा कोचरला पटवून याच व्हिडिओकॉनने मोठीच कर्जाऊ रक्कम घेतलेली होती. त्यामध्ये कोचर बाईंनीही आपले कोरडे हात धुवून घेतले होते, असे बरेच मंडळींचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांना चौकशीला सामोरे जावे लागले. एवढी उलथापालथ करणाऱ्या या व्हिडिओकॉन वर बँकेचे ७० हजार कोटींचे कर्ज आहे. त्यासाठी याच कंपनीने एक प्रस्ताव दिलेला आहे. त्यामध्ये एकूण रकमेपैकी अर्ध्या रकमेत या सगळ्या प्रकरणाचा निपटारा करावा असा कंपनीचा आग्रह आहे. याला वाणिज्य भाषेत वन टाइम सेटलमेंट म्हणतात. मग या सेटलमेंटसाठी म्हणजेच हे 35 हजार कोटी रुपये वसूल करण्यासाठी ग्राहकांना वेठीस धरा आणि वसूल करा अशीच सध्याची रीत आहे. पूर्वी बँकांमधील ज्या खातेदारांनी ठेवी ठेवलेल्या असायच्या. त्या पैशांनीच बँका कर्ज देत होत्या, जी रक्कम कर्ज घेणा ?यांना दिली जात असे. त्या कर्जदारांकडून व्याजाच्या स्वरूपामध्ये तीच रक्कम वसूल केली जात असे. आता बँकेमधील ठेवीवर तेवढे व्याज बँका देत नाहीत, त्या पुढची गोष्ट म्हणजे आता छोटी छोटी कर्ज घेण्यासाठी सामान्य ग्राहक मागे पुढे पाहतात. मग मोठ्यामोठ्या रकमांचे कर्ज भागवायला बँकांनी नवनवीन फंडे शोधलेले आहेत. या सगळ्या खेळांमध्ये राष्ट्रीयकृत काय, शेड्युल्ड काय किंवा खाजगी बँका काय, आपला ताळेबंद नफ्याचा करीत आहेत. अशा प्रकारे आपल्या बँकातील तूट भरून काढण्यासाठी ग्राहकांची लूट होत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विशेष म्हणजे बँकांची तूट आणि ग्राहकांची लूट वंदे भारतच्या वेगाने सुरू आहे त्यासाठी तुम्ही आम्ही कितीही बोंबा मारल्या तरी कोणीही ऐकायला तयार नाही. कारण तो आवाज त्यांच्या कानापर्यंत जात नाही किंवा गेला तरी ऐकला जात नाही ही खरी गोष्ट आहे. बँकांचे आणि आपले जमत नसले तरी बँकांशिवाय आपलेही भागत नाही हेच खरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ९ मृत्यू
## मुंबईत रस्ते, महामार्ग, रेल्वे स्थानके, विमानतळ सर्वत्र पाणी : लष्कराची मदत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई / नागपूर, दि. १९ :**
मुंबईसह महाराष्ट्रातील बहुतेक भागात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसामुळे मुंबईची परिस्थिती बिकट आहे. मुंबईकरांना कोणताही दिलासा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. आजही सततचा मुसळधार पाऊस सुरू आहे.

सोमवारी रात्रीपासून मुंबईत पाऊस पडत आहे. मंगळवारी सकाळपासून पाऊस आणखी तीव्र झाला आहे. त्यामुळे मुंबईतील अनेक भागात पाणी साचले आहे. हवामान खात्याने मुंबई आणि त्याच्या आसपासच्या भागात रेड अलर्ट जारी केला आहे.



मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मिठी नदीने धोक्याची पातळी गाठली असून पवईतील मारवाह इंडस्ट्री परिसरात तिचं रौद्र रूप दिसून आलं आहे. मिठी नदीच्या उगमस्थानी असलेल्या या भागात पाण्याचा जोरदार प्रवाह पाहायला मिळत असून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

मुंबईला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आल्यामुळे मुंबईतील सर्व सरकारी आणि निमसरकारी कार्यालयाला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या सोबतच सर्व शाळा आणि महाविद्यालय देखील आज बंद ठेवण्यात आले होते.

### टाटा मेमोरियल सेंटरच्या दवाखाना आणि संशोधन केंद्रास
## शासनाकडून मुद्रांक शुल्क माफ

**राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय**

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यात मुंबईतील टाटा मेमोरियल सेंटरच्या एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्रास मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त कोल्हापुरातील सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमीटेड, संस्थेस कसबा करवीर, बी वॉर्ड, कोल्हापूर येथील गट क्र.६९७/३/६ मधील २ हे. ५० आर जमीन दिली जाणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील मौजे वेंगुर्ला - कॅम्प गवळीवाडा येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-क (तांत्रिक) संवर्गातील विविध पदावर २९ दिवस तत्त्वावर कार्यरत १७ कर्मचाऱ्यांची तात्पुरती सेवा नियमित करण्यास मान्यता देण्यात आली.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अलर्टवर

**तात्काळ मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार ■ नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
राज्यात १४ लाख एकर पिकांचे नुकसान झाले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्यातील राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरु आहेत. मुंबईतील मिठी नदी धोका पातळीवर गेली असल्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेकांना वाचवण्यासाठी प्रयत्न करावे लागले असल्याचे त्यांनी सांगितले.

अलीकडच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील स्वतः मिठी नदीवर जाऊन पाहणी करत आहेत. सर्वच ठिकाणची परिस्थिती नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुंबईतील नागरिकांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जास्तीत जास्त लोकांना वर्क फॉर्म होम देण्याचे निर्देश राज्य सरकारच्या वतीने देण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

आतापर्यंतची परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात असली तरी अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात पाऊस आणि टायफाइड असल्यामुळे उपाययोजना कराव्या लागणार असल्याचे ते म्हणाले.



राज्य शासनाच्या वतीने एनडीआरएफ आणि एसडीआरएफला अलर्टवर ठेवण्यात आले आहे. काही नद्या इशारा पातळीच्या वर देखील गेल्या आहेत, तर काही नद्या इशारा पातळीवर वाहत आहेत. शेजारील राज्यांसोबत उत्तम समन्वय साधला जात आहे. शेजारी राज्य देखील महाराष्ट्राला मदत करत आहेत. काही राज्यांनी विसर्ग सुरू केला आहे. आपण देखील काही विसर्ग करत आहोत. तेलंगणा राज्य सोबत देखील आपण संपर्क करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ज्या ठिकाणी जनावरांचे नुकसान झाले आहे, घरांचे नुकसान झाले आहे किंवा दुर्दैवाने मृत्यु झाला आहे. त्या संदर्भात मदतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी त्यांना तात्काळ मदत करू शकतात. त्यांना थेट पैसे देण्याचेही अधिकार दिलेले आहे. त्यामुळे तिथे अडचण येणार नाही. शेती संदर्भात देखील पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.

## आता लाडकी सून अभियान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
राज्यातील सुनांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराला आळा घालण्यासाठी आता शिंदेसेना लाडकी सून अभियान राबवणार आहे, अशी महत्त्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात केली.



लाडकी बहीण योजनेच्या प्रचंड यशानंतर, आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शिवसेनेने ही नवी मोहीम हाती घेतली आहे. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळाला बळी पडलेल्या महिलांना तात्काळ मदत पुरवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेमुळे महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न असल्याची टीका विरोधकांकडून होण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेने हे अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी याविषयी माहिती दिली.

## मुंबईत मोनो रेल अधांतरी अडकली

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**
चेंबूर ते भक्ती मार्ग दरम्यान एक मोनो रेल आज सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास बंद पडली आणि एका बाजूला झुकली होती. सव्वातासाच्या प्रयत्नांनंतर प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.

दोन-तीन ठिकाणच्या काचा फोडून या प्रवाशांना मोनो रेलमधून बाहेर काढण्यात आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडल्याचे मोनो रेल प्रशासनाकडून सांगण्यात आले. कुणीही प्रवासी जखमी झाला नाही.

## बी सुदर्शन रेड्डी विरोधी पक्षाचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :**
इंडिया ब्लॉकने मंगळवारी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली. त्यांचा सामना एनडीएचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांच्याशी होईल.



७९ वर्षीय रेड्डी हे गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि गोव्याचे पहिले लोकायुक्त होते. ते मूळचे संयुक्त आंध्र प्रदेशचे आहेत. २००७ मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. राधाकृष्णन २० ऑगस्ट रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणीही होईल. नामांकन दाखल करण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट आहे. २५ ऑगस्टपर्यंत नामांकन मागे घेता येईल.

निवृत्त न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांचा जन्म ८ जुलै १९४६ रोजी झाला. त्यांनी बीए, एलएलबी केले आहे. २ मे १९९५ रोजी त्यांची आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर ५ डिसेंबर २००५ रोजी त्यांची गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. २०११ मध्ये ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून निवृत्त झाले.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरीची याचिका फेटाळली

**उच्च न्यायालयानंतर सर्वोच्च न्यायालयातूनही विरोधकांना झटका**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
नोव्हेंबर २,२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गडबड झाली असल्याचा आरोप करत संपूर्ण विरोधी पक्ष रस्त्यावर उतरला आहे. मात्र, विरोधी पक्षाला या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे.

ही तक्रार महाराष्ट्र उच्च न्यायालयानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीसाठी योग्य मानली नाही. जूनमध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते, जे फेटाळण्यात आले. विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर ७२ लाख मते चुकीच्या पद्धतीने टाकण्यात आली, त्यामुळे निवडणूक निकाल रद्द करावेत, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने ही याचिका केवळ कायदेशीर प्रक्रियेचे उल्लंघन मानली नाही तर अशा याचिकांवर दंडही आकारला जाऊ शकतो असा इशाराही दिला होता. आता सर्वोच्च न्यायालयानेही ही याचिका फेटाळली आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही हा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच त्यासाठी महादेवपुराचे उदाहरण दिले होते. त्यानंतर संपूर्ण विरोधी पक्ष निवडणूक आयोगावर मत चोरीचा आरोप करत आहे. त्याला निवडणूक आयोगानेही प्रत्युत्तर दिले आहे.

वास्तविक महाराष्ट्रातील एक नागरिक चंद्रकांत अहिर यांनी ही याचिका दाखल केली होती. या संबंधात जूनमध्ये दिलेल्या निर्णयात न्यायालयाने निवडणूक रद्द करण्याची याचिका फेटाळून लावली होती.

चेतन आणि प्रकाश यांनी मतमोजणीवर प्रश्न उपस्थित केले होते. मतमोजणीत लाखो मतांचा फरक असल्याचा दावा केला होता, परंतु निवडणूक आयोगाने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आणि आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे.

## गणेशोत्सवाला राज्यमहोत्सवचा दर्जा : बोधचिन्हाचे अनावरण




**महाराष्ट्राच्या संस्कृतीचा जगभर गजर!**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला नवी ओळख मिळाली आहे. यंदा प्रथमच गणेशोत्सव राज्यमहोत्सव म्हणून साजरा होणार असून, त्याचे बोधचिन्ह आज कॅबिनेट बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत अनावरण करण्यात आले.

राज्य सरकारने या भव्य सोहळ्यासाठी तब्बल ११ कोटींचा निधी मंजूर केला असून, सांस्कृतिक कार्य, लोककला, स्पर्धा, व्याख्याने, रोषणाई आदींनी सजलेले कार्यक्रम देश-विदेशात महाराष्ट्राच्या परंपरेचा गजर करणार आहेत. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक एकतेचा व सांस्कृतिक वैभवाचा मानबिंदू आहे; आता हा उत्सव जगाच्या नकाशावर नेऊ, असे आश्वासन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

या महोत्सवाला विशेष उंची देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर (भारतीय सैन्याचा शौर्यगौरव) आणि स्वदेशीचा जागर (आत्मनिर्भर भारताची दिशा) हे विषय जोडले गेले आहेत.

शतकांपासून घराघरात आणि सार्वजनिक स्तरावर साजरा होणारा गणेशोत्सव आता थेट शासनाच्या सहभागातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचणार आहे. महाराष्ट्राच्या अध्यात्म, भक्ती आणि परंपरेचा हा जगभर दणका ठरणार आहे.

## महाराष्ट्रात ४२,८९२ कोटींची गुंतवणूक

**२५८९२ रोजगाराची निर्मिती : १० सामंजस्य करार**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
महाराष्ट्र डेटा सेंटर कॅपिटल आणि सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल म्हणून पुढे येत आहे. अनेक कंपन्या या क्षेत्रांत येत असून उत्पादन क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे.

यूकेसोबत झालेल्या रणनीतिक करारामुळे नवे दरवाजे उघडले असून भारतात अधिक गुंतवणूक होत आहे. हे गुंतवणूकदारांचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे द्योतक आहे. आज विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार आणि दोन रणनीतिक करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात तब्बल ४२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन २८ हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थित आज मंत्रालयातील समिती कक्षात १० सामंजस्य करारांचे आदानप्रदान करण्यात आले. त्यावेळी ते गुंतवणूकदारांसमोर बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेशुमार, उद्योग सचिव डॉ. पी. अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासू, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच कंपन्यांचे गुंतवणूकदार उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, गुंतवणूकदारांनी अतिशय ठाम आणि सकारात्मक बांधिलकी दाखवली आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरळीत होण्यासाठी शासनाची संपूर्ण टीम सुरुवातीपासून शेवटपर्यंत तुमच्यासोबत काम करेल. याशिवाय हायपरलूप प्रकल्पालाही गती मिळत आता आयआयटी मुंबई व आयआयटी मद्रास यांच्यामुळे हा प्रकल्प पुन्हा पुढे सरकला आहे. हा प्रकल्प लॉजिस्टिक, वाहतूक आणि मोबिलिटी क्षेत्रात राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात आमूलाग्र बदल घडवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलर पॅनेल निर्मितीसाठी ज्युपिटर इंटरनॅशनल लि. या कंपनीसोबत १०९०० कोटी रूपयांची ८३०८ रोजगार निर्मिती होणार आहे. रोचक सिस्टिम्स प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर करिता २५०८ कोटी रूपयांचा करार झाला असून १ हजार रोजगार निर्मिती होईल. रोव्हिसन टेक हब प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर या सेक्टरकरिता २५६४ कोटी रूपयांची गुंतवणूक करार झाला असून ११०० रोजगार निर्मिती होईल. वॉव आयर्न ॲण्ड स्टिल प्रा. लि. यासाठी पोलाद उद्योगाकरिता ४३०० कोटी रूपयांचा करार झाला असून १५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

वेबमिंट डिजिटल प्रा. लि. या कंपनीसोबत डेटा सेंटरकरिता ४८४६ कोटी रूपयांचा गुंतवणूक करार असून २०५० रोजगार निर्मिती तर औद्योगिक उपकरणे क्षेत्राकरिता ॲटलास्ट कॉपको या कंपनीसोबत ५७५ कोटी रूपयांचा करार असून ३४०० रोजगार निर्मिती होईल. हरित उर्जा क्षेत्रात एलएनके ग्रीन एनर्जी या कंपनीसोबत ४७०० कोटी रूपयांचा गुंतवणूक करार असून २५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. डेटा सेंटर, लॉजिस्टिक सेंटर रिअल इस्टेट या क्षेत्राकरिता प्रेस्टीज इस्टेट प्रोजेक्ट लि.या कंपनीसोबत १२५०० कोटी रूपयांचा गुंतवणूक करार असून ८७०० रोजगार निर्मिती होईल. याशिवाय, युके व युरोपमधील गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सहकार्य करण्याचा सामंजस्य करार करण्यात आला.

# ‘प्लेसमेंट ड्राईव्ह’मध्ये १०० पदे भरणार

**अकोला :** जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने दि. २० ऑगस्ट रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह- पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात ४ नामांकित खासगी कंपन्यांमार्फत एकूण १०० रिक्त पदांची भरती केली जाणार आहे. यामध्ये शैक्षणिक पात्रता दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. या मेळाव्याकरिता ऑनलाईन अर्ज प्रक्रीया https://rojgar.mahaswayam.gov.in/#/home/index या वेबपोर्टलच्या माध्यमातून करावा व दि. २० ऑगस्ट रोजी मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष उपस्थित राहावे. या रोजगार मेळाव्यास ऑनलाईन सहभाग नोंदवावा.जास्तीत जास्त नोकरी इच्छूक उमेदवारांनी आपले बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पारपत्र आकारातील छायाचित्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, प्रशासकीय इमारत, दुसरा माळा, अकोला येथे स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी दू. क्र. ०७२४ – २४३३८४९ किंवा ७०२४२४१०९८ / ९४२१४२५०६६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे.

## शासन शेतकरी बांधवांच्या खंबीरपणे पाठीशी उभे : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे वेळेत पूर्ण करताना, प्रत्येक नुकसानाची तपशीलवार नोंद घ्यावी. शासन शेतकरी बांधवांच्या खंबीरपणे पाठीशी उभे आहे. जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी बांधव मदतीपासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याशी चर्चा करून पावसाच्या स्थितीचा, नुकसान व आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेतला व पंचनाम्याची प्रक्रिया विनाविलंब पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी दिले.



प्राथमिक अहवालानुसार, दि. १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यातील ११ मंडळांत अतिवृष्टी झाली. तूर, सोयाबीन, कपाशी व इतर पिकांचे ५९ हजार २८९ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. ३८१ घरांचे अंशतः व ८ घरांचे पूर्णतः, तसेच २६ पशुधनाचे नुकसान झाले आहे.मुर्तिजापूर, अकोला यासह सर्व तालुक्यात अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. त्यामुळे सर्व बाधित क्षेत्रात अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतः पोहोचून नुकसानीचे पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे समजून घ्यावे. संवेदनशीलता बाळगून पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करावी. कोणीही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये, याची दक्षता घ्यावी. घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामेही तपशीलवार पद्धतीने करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

हवामान विभागाने दिलेले इशारे गांभीर्याने घेऊन त्यानुसार यंत्रणा सुसज्ज ठेवावी. नदीकाठच्या गावांना धोका पोहोचण्याची शक्यता असेल तर सावध करण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत संदेश,आवश्यक सूचना वेळीच व सर्वदूर प्रसारित कराव्यात. प्रकल्प पातळीवर देखरेख ठेवावी. भक्कम संपर्क यंत्रणा, गावोगाव आवश्यक बाबींची पूर्तता करावी, असे निर्देश पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी दिले.

## पशुपालकांनी किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
पशुधनाच्या आहार, उपचार, विमा आदी संगोपनासाठी किसान क्रेडिट कार्डाआधारे अल्पकालीन कर्ज मिळते. या योजनेचा जिल्ह्यातील पशुपालक बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.पशुधनाचा आहार, वैद्यकीय उपचार, विमा, वीजपुरवठा, इन्व्हर्टर आदी बाबींसाठी खेळते भांडवल म्हणून पशुधनावर १ लक्ष ६० हजार रू. पर्यंत अल्पकालीन कर्ज, तर शेतीवर ३ लक्ष रू. पर्यंत कर्ज मिळू शकते.या योजनेत सहभाग घेण्यासाठी गरजू पशुपालकांना जनसमर्थ हे ऑनलाईन ॲपवरून आपल्या बँकेला अर्ज करता येईल. त्यासाठी लवकरात लवकर किसान क्रेडिट कार्ड काढावे, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जगदीश बुकतारे यांनी केले.

## लाखपुरी येथे जिल्हाधिकारी यांनी जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या व्यथा



**▪लाखपुरी,दि १९ (प्रतिनिधी) :**
मुर्तीजापूर तालुक्यातील लाखपुरी येथे लाखपुरी सह लाखपुरी सर्कल मधील अनेक गावात ढग फुटी अवकाळी पाऊसामुळे दि. १६ ला झालेल्या पाऊसामुळे कापुस , तुर ,सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात अतोनात नुकसान झाले . होते त्यामुळे हजारो हेक्टर शेतीच्या पिकांचे नुकसान झाले . लाखपुरी व लाखपुरी सर्कल मधील अनेक ठिकाणी घरांचे सुध्दा पडझड झाली त्या करिता जिल्हाधिकारी अकोला अजित कुंभार यांनी स्वता पाहणी केली. व शेतकऱ्यांच्या समस्या जाऊन घेतल्या यावेळी उपविभागीय अधिकारी संदीप अपार ,जिल्हा कृषी अधिकारी अकोला शंकर किरवे, तहसीलदार शिल्पा बोबडे, तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे, सरपंच राजप्रसाद कैथवास, कृषी अधिकारी के.व्ही. वानखडे साहेब, मंडळ अधिकारी राजेद्र जाधव , तलाठी वीरेंद्र वानखडे, कृषी सेवक राठोड साहेब, महसूल सेवक आरती कैथवास, पत्रकार अतुल नवघरे , गजानन गवई सह लाखपुरी सर्कल मधील अनेक शेतकरी उपस्थित होते.

## अकोला जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा!

**सततच्या पावसामुळे पिकांचे शंभर टक्के नुकसान; पंचनामे व तातडीच्या आर्थिक मदतीची गरज**

### ▪समाजसेवक गजानन हरणे यांची मागणी

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
ऑगस्ट :महिन्यांत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अकोला जिल्ह्यातील शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाले आहेत. शेतजमिनी सतत पाण्याखाली राहिल्याने तूर, मुग, सोयाबीन, उडीद, कापूस यांसह खरीप हंगामातील सर्व पिके उद्ध्वस्त झाली आहेत. जिल्ह्यातील शंभर टक्के पिकांचे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी ठाम मागणी समाजसेवक गजानन हरणे ,संयोजक, निर्भय बनो जन आंदोलन यांनी केली आहे.



**शेतकरी संकटात; शासनाकडे तातडीच्या मदतीची अपेक्षा**

ऑगस्टपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. हजारो एकर शेती पाण्याखाली गेल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. ङ्गजिल्हा प्रशासनाने तत्काळ शेतकऱ्यांच्या शेतीवर जाऊन पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य व पुरेशी आर्थिक मदत द्यावी,ङ्घ अशी मागणी हरणे यांनी केली.

प्रशासनाकडे लक्ष वेधणारी मागणी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलेल्या या मागणीला शेतकरी वर्गातून मोठा प्रतिसाद मिळत असून जिल्हा प्रशासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## शिक्षिकेची सोन्याची बांगडी हरवली!

**मूर्तिजापूर :** स्थानिक गणेशनगरमध्ये राहत असलेल्या सेवानिवृत शिक्षिका प्रतिभा दिनकर शेवाणे ह्या सोमवारी ११.३० ते १२ वाजेदरम्यान बाहेरगाववरून बसने प्रवास करून पायी आपल्या घराकडे जात होत्या. स्टेशन विभाग येथील साईश्री शॉपजवळ पर्समध्ये ठेवलेल्या बांगड्यांच्या पर्समधुन स्कॉर्प काढला असता दोन पैकी एक बांगडी तेथे पडली. ही बाब त्यांच्या घरी आल्यावर लक्षात आली. त्यांनी तत्काळ सदर ठिकाणी पाहणी केली असता दिसून न आल्याने तशी फिर्याद सिटी पोलिस ठाण्यात देण्यात आल्यावरून पोलिस तपास करीत आहेत.

## सार्वजनिक गणेश मंडळांना परवानगी मिळविण्याकरिता मनपात एक खिडकी योजना कार्यान्वीत

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
अकोला शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत असतो व शहरातील सार्वजनिक ठिकाणी गणेश मंडळांव्दारे गणेश मंडप उभारून देखावे तयार करण्यात येत असतात त्यासाठी त्यांना नियमानुसार मंडप परवनागी, विद्युत जोडणीसाठी महावितरणची परवानगी, लाउडस्पीकरसाठी पोलीस विभागाची परवानगी, रस्त्यालगत मंडप उभारणीकरीता शहर वाहतुक विभागाची परवानगी तसेच महानगरपालिका नगररचना, अग्निशमन व बांधकाम विभागाची परवनगी घेणे अनिवार्य असते, शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना वरील परवानग्या मिळणे सोईचे व्हावे याकरिता पोलीस प्रशासन, महावितरण व महागनरपालिका प्रशासन, (धर्मदाय आयुक्त वगळून) वतीने देण्यात येणा-या सर्व परवानग्या एकाच ठिकाणी देण्याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने



यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे एक खिडकी योजना दि. १८ ऑगस्ट २०२५ पासून कार्यालयीन वेळेमध्ये कार्यान्वीत करण्यात आली आहे. तरी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिका-यांना जिल्हा प्रशासना, मनपा प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या तर्फे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### महान धरणाचे सर्व १० दरवाजे उघडले

बार्शिटाकळी: तालुक्यासह धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसाने महानच्या काटेपूर्णा प्रकल्पाचे सोमवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ आणि दुपारी ३ वाजता सर्व १० दरवाजे प्रत्येकी ६० सेंटीमीटर उघडून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. तसेच दगडपारवा धरणात ५७.९९ टक्के जलसाठा झाला आहे. महान धरणात सोमवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास ८४.७५४ टक्के पाणीसाठा होता. यावेळी सदर प्रकल्पाचे सहा दरवाजे ६० सेंमीने उघडून पाणी नदीपात्रात सोडण्यात आले होते. परंतु दुपारी तीन वाजताच्या सुमारास सदर धरण प्रकल्पात ९०.५६९ टक्के जलसाठा झाल्याने प्रकल्पाचे दहाही दरवाजे ६० सें. मी. ने उघडण्यात आले. पाऊस सुरूच असल्याने धरणाच्या जलसाठ्यात वाढ होण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या विसर्गात वाढ होऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. बार्शिटाकळीचे तहसीलदार राजेश वजिरे यांनी नदीकाठावरील गावातील कोतवाल, तलाठी व ग्रामसेवक यांना या गावात दवंडी, ध्वनीक्षेपकासह सोशल मीडियाच्या माध्यमातून गावातील जनतेला नदी व नाल्याच्या पाण्यातून तसेच पुलावर पाणी असल्यास पाण्यातून ये-जा करू नये. तसेच काटेपूर्णा धरण प्रकल्पात पाण्याची वाढ होत असल्याने धरणातून केव्हाही मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्या जाऊ शकते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सतर्कतेचा इशारा त्यांनी दिला आहे.

### गोगाजी महाराज यात्रेचे स्वागत‘

अकोला : वाल्मिकी समाजाचे आराध्य दैवत गोगाजी महाराज यांची गोगानवमी शनिवारी शहरात उत्साहात साजरी करण्यात आली श्री. रतनसिंह चावरीया महाराज संघच्या वतीने गोगाजी महाराज यांच्या विषेश आकर्षित निशान महाराष्ट्रचे पंढरीनाथ विठ्ठल यांच्या वरकरी संप्रदाय वर आधारीत विजय नगर अकोला येथील निघालेल्या निशानचे मानीक टांकीज जवळ निशानचे पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले तसेच स्वागताध्यक्ष गोतम भाऊ गवई राष्ट्रवादी पक्ष नेता यांच्या सह अनुपजी खरारे, सचिन चावरे, करण खरारे गोगाभक्त करन सारवान, दिपक थोनवाल, यांनी उत्साहात निघालेल्या सर्व निशान यात्राचे पूजन केले व यात्रेत सहभागी झालेल्या भक्तांना शुभैच्छा देऊन त्यांचे स्वागत केले. या स्वागत समारंभाचे आयोजन सचिन चावरे संस्थापक अध्यक्ष रतनसिंह चावरीया महाराज यांच्या वतीने करण्यात आले होते. कालु भगत निनोरे यांचे आखाळा चे स्वागत करण्यात आले.

## पातूर येथील विद्यार्थ्यांची मोफत डोळ्यांची तपासणी

**▪पातुर,दि १९ (प्रतिनिधी) :**
पातूर शहरातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेत नुकतेच मोफत नेत्र तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला.उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव मोहम्मद फरहान अमीन यांच्या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर वंदना ताई जगन्नाथ ढोणे आयुर्वेदिक महाविद्यालय व



रुग्णालय येथे घेण्यात आले.सततचा अभ्यास, मोबाईल व स्क्रीनचा वापर यामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांवर होणारा ताण लक्षात घेता, नेत्रतपासणी ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.शिबिरात नामांकित नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. काही विद्यार्थ्यांना चष्म्यांची गरज असल्याचे निदर्शनास आले, तर काहींना पुढील उपचारासाठी आवश्यक सल्ला देण्यात आला. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना डोळ्यांची योग्य काळजी कशी घ्यावी, याबाबत उपयुक्त मार्गदर्शनही केले.या उपक्रमाचे पालक आणि शिक्षक वर्गातून मोठ्या प्रमाणात स्वागत व कौतुक करण्यात आले. अशा प्रकारचे उपक्रम नियमितपणे राबवावेत, अशी मागणी अनेकांनी केली.या शिबिराच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष कमरुझ्झमा खान, विद्यार्थी काँग्रेस प्रदेश सचिव मोहम्मद फरहान अमीन, युवक शहर अध्यक्ष नातीक शेख, डॉ. अजमत, सय्यद फैजान, सय्यद साद, मोहम्मद काशिफ आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हा स्त्री रुग्णालयातील निलंबित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी आंदोलन



**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला या ठिकाणी श्री प्रमोद ढेंगे भांडारपाल यांनी चलानचे पैसे शासनाच्या खात्यात जमा न करता बरेच वर्षे स्वतः वापरुन शासकीय रक्कमेचा दुरुपयोग केला आहे. तसेच श्री प्रमोद ढेंगे यांनी कोणतीही परवानगी न घेता जिल्हा स्त्री रुग्णालय येथील लाखो रुपयाचे भंगार कुठलीही निवीदा न काढता, वरीष्ठांची परवानगी न घेता स्वतः विकुण रक्कम गळप केली आहे.त्यामुळे श्री प्रमोद ढेंगे यांनी शासनाच्या रक्कमेचा दुरउपयोग करुन अपहार केला असून ते सिध्द झाले आहे. हि शासनाची फसवणूक केल्यामुळे त्यांना तात्काळ बडतर्फ करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे. तसेच ड्यूटी इन्चार्ज छाया काळमेघ यांनी वरिष्ठांच्या नावाने ऑर्डर काढण्यासाठी प्रत्येक परिचारिके जवळुन जवळपास १५ ते २० हजार रुपये उकळले त्यांच्या वर चौकशी करून निलंबित करावे. जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथील नवजात शिशु अतिदक्षता विभागात भरती प्रक्रियेसाठी निवीदा प्रक्रिया नियमबाह्य प्रक्रियेने राबविण्यात आल्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरंगतुषार वारे मॅडम, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. जयंत पाटील, प्रशासकीय अधिकारी ए.एन. डांबरे यांना या प्रकरणी शासनाने निलंबीत केले आहे. त्यामुळे फुले आंबेडकरी राष्ट्रीय युवक संघटनेच्या वतीने वरील अधिका-यांवर गुन्हे दाखल करणे बाबत निवेदन पाठवण्यात आले होते.

परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. तसेच आरोग्य विभागामध्ये सद्या स्थितीत भ्रष्टाचाराचे थैमान झाले आहे. व भ्रष्टाचाराच्या बरेचशा बाबी समोर आल्या आहेत. समाज माध्यमामध्ये त्याच्या चित्रफित व बातम्या प्रसारीत झालेल्या आहेत असे असतांना सद्या आरोग्य विभाग परिमंडळाचे उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी हे वरील दोषी व भष्ट्राचारी अधिकारी व कर्मचारी यांची पाठराखन करीत आहे व त्यांना अभय देण्याचे काम डॉ. कमलेश भंडारी हे करीत आहे. त्यामुळे डॉ. कमलेश भंडारी, उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी या बाबी करीता फुले आंबेडकरी राष्ट्रीय विद्यार्थी युवक संघटनेच्या वतीने दि. १९/०८/२०२५ रोजी दुपारी १२ ते ३ या दरम्यान एकदिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले. जर दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल न झाल्यास उपोषण करण्यात येईल.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भोजने, माजी आमदार हरिदास भदे साहेब भारतीय बौद्ध महासभेचे मार्गदर्शक देविलाल तायडे विभागिय अध्यक्ष एम. एम तायडे, जिल्हाध्यक्ष दिवाकर गवई,जिल्हा महासचिव दयाराम तायडे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब अंभोरे,उमेश इंगळे सामाजिक कार्यकर्ते, जितेन्द्र अहीर,श्रीकांत खेंडकर, उमेश भाऊ गवई. संतोष भाऊ ढोले. सुमित तायडे. संतोष भाऊ डोंगरदिवे. शीलवंत वानखडे.सुनिल तायडे, प्रभाकर वानखडे. संतोष चक्रे. आशिष शिरसाट. ऋतिक कांबळे. कोमल कवळकर. राजेंद्र वानखडे. संजय वानखडे. प्रवीण भाऊ वाघ. अशीच सरदार. सुरज मेश्राम. गोपाल नवले. नितीन भाऊ सपकाळ (रुग्ण कल्याण समिती सदस्य). पंकज ईशान इंगळे. बबलू उमाळे. दारोकार सर.. इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

## संस्कार ही मानवी जीवनाची गरज :भागवताचार्य ज्ञानेश्वरमहाराज वाघ

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**
अगदी काल परवा पर्यंत घेणाऱ्या आणि देणाऱ्या अर्थातच बालक आणि त्यांच्या पालकांमध्ये शिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहिजे तेवढ्या प्रमाणात जागरूकता व उत्सुकताही नव्हती . आज मात्र शैक्षणिक क्षेत्रात जागृती व प्रगती सुद्धा भरपूर प्रमाणात झालेली आहे. म्हणूनच शिक्षण ही काळाची गरज आहे असे वाक्य अनेकांच्या मुखातून ऐकण्या करीता मिळतात आणि ते सत्यही आहे. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे शिक्षण ही काळाची तर ; संस्कार ही मानवी जीवनाची गरज आहे.

संस्काराच्या भरभक्कम पायावर उभारलेली जगाच्या पाठीवर एकमेव संस्कृती जर कोणती असेल तर , ती फक्त आणि फक्त भारतीय संस्कृतीच आहे. ती टिकून ठेवण्यासाठी बाल



संस्कार अत्यावश्यक आहेत . जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी भाषेचा अभ्यास असणे जितके गरजेचे आहे तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक प्रमाणात संस्कृती टिकण्यासाठी संस्कृत भाषेचा अभ्यास असणेही आवश्यक आहे. कारण संस्कृतीचे सर्व तत्त्वज्ञान हे संस्कृत भाषेत शब्दबद्ध करून धर्मग्रंथांमध्ये संग्रहित करण्यात आलेले आहे.भारतीय संस्कृती ही प्रगतीला विरोध करणारी नाही. परंतु स्वातंत्र्याचा केवळ स्वैराचार एवढाच अर्थ सद्यस्थितीमध्ये केल्या जात आहे . आणि त्याचे दुष्परिणाम कुटुंब व्यवस्था उध्वस्त होण्यामध्ये होत आहे . म्हणून प्रत्येक पालकांनी आपल्या बालकांना देशभाषा (मातृभाषा), वेशभूषा ( भारतीय पोशाख ), खानपान ( शुद्ध शाकाहारी भोजन ) आणि देह संबंध ( वैवाहिक जीवन) या चतु:सूत्रीचे तरी निदान योग्य ते मार्गदर्शन करून ; त्याची सक्तीने अंमलबजावणी त्यांच्याकडून करून घ्यावी . तरच आणि तरच आपल्या पूर्वजांनी जिवापाड प्रेम करून जपलेली सर्वोत्कृष्ट, सर्वसमावेशक, सर्वहितकारी, सर्वानुकरणीय, निश्चितफलदायनी स्वरूपाची सुलभ संस्कृती आणि अनादी परंपरा टिकतील अन्यथा नाही. आज आम्ही पाश्चात्यांचे अंधानुकरण करून जन्माचे व लग्नाचे वाढदिवस साजरे करायला लागलो . परंतु माता- पित्याची तेरवी मात्र विसरलो .आज जर आम्ही तेरवी मोडीत काढली आमचे पुढची पिढी आमच्यापेक्षा पुढारलेली असेल आणि ते आमचा अंत्यसंस्कार मोडीत काढण्याकरिता मागे पुढे पाहणार नाहीत. तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी गोठ्यातील जनावर मेल्यानंतर ते जसे गावाच्या बाहेर ओढत नेऊन फेकून दिल्या जातात त्याच प्रमाणे घरातील वृद्ध मृत व्यक्तींना नेऊन टाकल्या जाईल . हा संभाव्य धोका लक्षात घेऊन पूर्वजांनी चालू केलेल्या आणि जोपासलेल्या विज्ञाननिष्ठ परंपरा आपण सुद्धा सद्सदविवेक बुद्धी जागृत ठेवून जोपासल्या पाहिजेत .

## पातुर येथे जन्मष्टमी व गोपाळकाला निमित्त दहिहंडी उत्सव आनंदात साजरा

**▪पातुर,दि १९ (प्रतिनिधी) :**
पातुर येथील कान्होबा चौक येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा राखोंडे परिवार व साने गुरुजी मंडळ,पातुर व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान,पातुर व स्व.विनायक राखोंडे स्मृती गणेशोत्सव मंडळ,पातूर यांच्या वतिने श्री कान्होबा यांच्या मंदिरामध्ये श्रीकृष्ण जन्मष्टमी निमित्त मध्यरात्री श्री कान्होबा यांची विधिवत पुजा केली तर दुसऱ्या दिवशी महाआरती करुन सायंकाळी पातूर येथील मध्य नगरीतील कान्होबा चौकामध्ये गोपाळकाला निमित्य दहीहंडी फोडुन उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी सदर सर्व युवकांनी व बाल गोपालांनी



एकमेकांच्या सहकार्याने मानवी मनोरा उभा करून बाळू उर्फ गणेश देवकर यांने तिसऱ्या थरावर चढुन दहीहंडी फोडली यावेळी राखोंडे परिवारा कडुन उपस्थित सर्व बाल गोपालांना दहिकाल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.

# ट्रम्प-पुतिन भेटीतून निष्पन्न काय?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांच्या भेटीत अलास्का येथे तीन तास चर्चा झाली पण त्यातून काय निष्पन्न झाले, या प्रश्नाचे गूढ कायम आहे. दोन्ही शक्तिशाली नेत्यांच्या भेटीकडे सर्व जगाचे लक्ष लागून राहिले होते, या भेटीत ते दोघे जो निर्णय घेतील किंवा ते जे ठरवतील त्याचा संपूर्ण जगावर परिणाम होणार हे निश्चित होते. पण गेले महिनाभर गाजावाजा करून झालेल्या या भेटीत या दोन्ही नेत्यांत कोणताही समझौता झाला नाही किंवा करार झाला नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वांना जे अपेक्षित होते तो रशिया- युक्रेन युध्दविरामाचा निर्णयही झाला नाही. म्हणूनच या भेटींनंतर सरस कोण ठरले की ट्रम्प की पुतिन या प्रश्नाने सर्व जगात काहूर माजले आहे.

-------------

दोन शक्तिशाली देशांच्या प्रमुखांची ही ठरवून झालेली भेट होती. अशा उच्चस्तरीय भेटीसाठी दोन्ही देशांचे मंत्री व सचिव पातळीवरील वरिष्ठ अधिकारी हे अगोदरपासून चांगली तयारी करतात, उत्तम गृहपाठ व उत्तम उजळणी करतात ही तर पध्दतच आहे.

दोन राष्ट्रप्रमुखांनी कोणत्या मुद्यांवर चर्चा करायची व कोणत्या मुद्यांना प्राधान्य द्यायचे याचाही अगोदर खल झालेला असतो मग महत्वाच्या मुद्यांवर दोन्ही नेत्यात तीन तासाच्या चर्चेनंतर एकमत का होऊ शकले नाही? कोणाच्या कठोर व हटवादी भूमिकेमुळे दोन्ही नेत्यात समझौता होऊ शकला नाही? हजारो सैनिकांचे व लक्षावधी निरापराध नागरीकांचे बळी गेल्यानंतरही रशिया- युक्रेन युध्दविरामाची घोषणा का होऊ शकली नाही?

तीन तासाच्या चर्चेनंतर ट्रम्प आणि पुतिन यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली पण अवघ्या बारा मिनिटात ती संपली. जगभरातून आलेल्या पत्रकारांच्या कोणत्याही प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले नाही. बैठक सकारात्मक झाली, काही मुद्यांवर सहमती झाली, पण कोणताही करार झालेला नाही, असे दोन्ही नेत्यांनी स्पष्ट केले.

सन २०१५ नंतर म्हणजेच दहा वर्षांनी पुतिन अमेरिकेत आले होते. ते रेड कार्पेटवर येताच ट्रम्प यांनी स्वतः त्यांचे स्वागत केले. पुतिन व ट्रम्प एकाच मोटरीतून बैठकीसाठी रवाना झाले.

अलास्का २५ असे शब्द लिहिलेल्या मंचावर दोन्ही नेत्यांनी उभे राहून फोटो काढून घेतले. पण बैठकीतून फलनिष्पत्ती काहीच नाही असे म्हणावे लागेल. बैठक सकारात्मक झाली पण कोणताही सौदा झाला नाही, जो पर्यंत सौदा होत नाही तो पर्यंत समझौता होणार नाही हेच संकेत या बैठकीतून दिले गेले.

खरे तर दोन्ही नेत्यांत थेट भेट होणार असे ठरल होते, पण चर्चेच्या वेळी दोन्ही देशांचे वरिष्ठ अधिकारी व मंत्री उपस्थित होते. या बैठकीनंतर युध्दविरामाची घोषणा होणार का? याकडे सर्व जगाचे लक्ष लागले होते.

तसेच रशिया व अमेरिका यांच्यातील संबंधाविषयी नवीन पावले काय उचलली जाणार आहेत. याचीही जगात सर्वांना उत्सुकता होती. पण या दोन्ही मुद्यांवर दोन्ही नेत्यांनी कोणतेही भाष्य केले नाही. ट्रम्प व पुतिन यांच्यातील चर्चा निष्फळ ठरली अशाच प्रतिक्रिया जगातून उमटत आहेत.

बैठकीत सन्मानजनक चर्चा झाली असा सूर पुतिन यांनी लावला आहे. तर पुतिन यांच्याशी थेट चर्चा करण्यासाठी अमेरिका एका टेबलावर पोचली हे ट्रम्प यांनी दाखवून दिले, एवढेच म्हणता येईल. चर्चा होईल पण निर्णय आपल्या शर्तीनुसार घेतले जातील यावर पुतिन बैठकीत ठाम राहिले असा एक अर्थ काढला जातो आहे.



**इंडिया कॉलिंग**

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, बैठक चांगली झाली, उपयोगी ठरली, काही मुद्यांवर सहमती झाली पण काही मुद्यांवर बाकी आहे. म्हणजेच ट्रम्प व पुतिन यांच्या तीन तासाच्या चर्चेत कोणत्याही प्रमुख मुद्यावर एकमत होऊ शकलेले नाही हाच त्याचा अर्थ आहे.

बारा मिनिटांच्या पत्रकार परिषदेला सुरूवात पुतिन यांनी केली व तेच अधिक वेळ बोलले. ही पत्रकार परिषद पुतिन यांची होती व ट्रम्प त्याला उपस्थित राहिले असे चित्र त्यावेळी दिसले. हे दोन्ही नेत्यांनी असे ठरवून केले का याचा मात्र उलगडा झालेला नाही.

रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना जास्त कर लावले जातील अशी धमकी काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांना दिली होती. मात्र तेल खरेदी करणाऱ्या चीनवर तत्काळ टेरिफ लावण्याचा विचार नाही असे सांगून त्यांनी घुमजाव केले होते.

चीन व भारत हे रशियाकडून तेल खरेदी करणारे मोठे देश आहेत. भारतावर अमेरिकेने २५ टक्के टेरिफ लावले आहेच. सन २०२० मधे अमेरिकेत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत टपाल मतदानात घोटाळा झाल्याचे पुतिन यांनीच ट्रंम्प यांना सांगितले.

त्या निवडणुकीत ट्रम्प यांना पराभव पत्करावा लागला होता. स्वतः ट्रम्प यांनी बैठकीनंतर फॉक्स वृत्तसंस्थेशी बोलताना ही माहिती दिली. सन २०२२ मधे ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असते तर युक्रेन- रशिया युध्द झालेच नसते, अशीही पुष्टी पुतिन यांनी जोडल्याचे आता पुढे येत आहे.

अलास्का बैठकीत युक्रेनबरोबर युध्दविरामाचा निर्णय झाला नाही हा पुतिन यांचा विजय असल्याचे अनेकांना वाटते. पुढील बैठक मॉस्कोमधे घ्यावी असे पुतिन यांनी ट्रम्प यांना निमंत्रण दिले आहे. पण ट्रम्प, पुतिन व युक्रेनचे प्रमुख झेलंस्की अशा त्रिपक्षीय बैठकीनंतरच युध्दविराम होऊ शकतो असे अनेकांना वाटते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत- पाकिस्तान युध्द आपण थांबवले असे किमान २८ वेळा सांगितले आहे. आपल्याला जगात शांतता निर्माण करायची आहे म्हणून युध्दविरामासाठी ते दबाव टाकून प्रयत्न करीत आहेत. पण पुतिन यांनी आपला हेका सोडलेला नाही.

युक्रेनमधील भूभाग घेतल्याशिवाय युध्द थांबणार नाही ही पुतिन यांनी त्यांची भूमिका कायम ठेवली आहे. अलास्कामधील बैठकीचा परिणाम म्हणून रशिया व युक्रेन या दोन्ही देशातील युध्दकैद्यांची नजिकच्या काळात देवाण- घेवाण होईल, एवढा एकच आशेचा किरण दिसतो आहे.

# मत चोरी

सध्या भारतीय राजकारणात मतांच्या चोरीवरून चांगलेच रणकंदन सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. राहुल गांधींनी मतांची चोरी झाल्याचा आरोप करून एकच खळबळ उडवून दिलेली आहे. कर्नाटकातील एका मतदारसंघांमध्ये संशोधन करून कशाप्रकारे मतांची चोरी केल्या गेली हे त्यांनी प्रसार माध्यमांसमोर पीपीटीच्या माध्यमातून समोर आणले आहे. जवळपास एक तास ११ मिनिटे त्यांनी मतदार यादीत कशी चोरी झाली याची संपूर्ण वस्तु निष्ठ माहिती देशातील जनतेच्या समोर ठेवल्यामुळे सामान्य जनता निवडणूक आयोगाच्या कारभाराविषयी प्रश्न निर्माण करीत आहे.

आपल्या घटनेने आपल्याला एक व्यक्ती एक मत याचे स्वातंत्र्य दिलेले आहे देशातला गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला एका मताचा समान अधिकार आहे. आज पर्यंत सामान्य माणसाच्या मतांच्या भरोशावर सरकारे आलीत आणि आणि सरकारी गेलीत. मात्र गेल्या अनेक वर्षात निवडणूक आयोगावर कुणीही आक्षेप घेतलेला नव्हता.

१९५२ पासून या देशात निपक्ष व निर्भीड वातावरणात निवडणुका पार पाडत आल्याचे अनेकदा बघायला मिळाले. तेव्हा तंत्रज्ञानाचा तेवढा प्रचार झाला नव्हता आणि तरीसुद्धा सामान्य माणसांनी रांगांच्या रांगा लावून लोकशाहीचे पर्व साजरे केले होते. निवडणुकीच्या माध्यमातून सामान्य लोकांनी आपले हक्काचे सरकार निवडले होते.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

सामान्य माणसाच्या मतांच्या जोरावरच आपली लोकशाही टिकून राहिली.

मध्यंतरी भाजपाच्या काही नेतेमंडळींनी संविधान बदलाबाबतची वक्तव्ये केली. अबकी बार ४०० पार असा नारा दिला गेला. भाजप संविधान बदलण्यासाठी असा नारा देत आहे, असा लोकांचा समज झाला. २०२४ च्या निवडणुकीमध्ये भाजपाचा ग्राफ ३०५ वरून २४० असा खाली आला.

गेल्या ७० वर्षात अनेक निवडणुका झाल्यात अनेक राज्यात सरकारे बदललीत अनेक दिग्गजांचा पराभव झाला. लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींचा ही पराभव झाला होता. त्यावेळेला बॅलेट पेपरवर निवडूका घेतल्या जायच्या निवडणूक आयोग अतिशय उत्तम पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडायचे आता मात्र निवडणूक आयोग संशयाच्या फेऱ्यात सापडला आहे, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले.

निवडणूक आयोग ही भारत सरकारच्या अखात्यारीत येते. ती एक स्वतंत्र स्वायत संस्था आहे. भारतीय संविधान कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. मतदार संघ आखणे, मतदार यादी तयार करणे, राजकीय पक्षांना मान्यता देणे, निवडणुका पार पडणे, राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह देणे, यासारखी कामे निवडणूक आयोगाला पार पाळावी लागतात. मात्र अडीकडील काळात निवडणूक आयोगाच्या कार्य पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

सत्ताधारी पक्षांच्या सूचनेनुसार निवडणूक आयोग देशात कार्य करीत आहे हा मुख्य आरोप विरोधी पक्षांचा आहे. कर्नाटकातील एका दहा बाय दहाच्या खोलीत ९० मतदार राहतात सर्वांचा एकच पत्ता असतो, आई-वडिलांचे नाव सुद्धा एकच असते, हा प्रकार नक्कीच लोकशाही शासन व्यवस्थेसाठी हानिकारक आहे. याचा अर्थ निवडणूक आयोग योग्य पद्धतीने संविधानानुसार कार्य करीत नसल्याची प्रचिती देत आहे.

या घटना देशाच्या अलीकडील वाटचालीसाठी हानिकारक ठरण्याची शक्यता आहे जिथे निवडणूक आयोगच पारदर्शी नसेल तर भविष्य काळात वाटचाल खूपच कठीण आहे. डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करा अशी राहुल गांधींची मागणी होती. डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करा, अशी राहुल गांधींची मागणी होती. मात्र ती आयोगाने फेटाळून लावली. अलीकडील वाटचालीसाठी हानिकारक ठरण्याची शक्यता आहे. जिथे निवडणूक आयोगच पारदर्शी नसेल तर भविष्य काळात वाटचाल खूपच कठीण आहे. उलट आपली वेबसाईट निवडणूक आयोगाने बंद करून ठेवली. याला काय म्हणायचे?

जनता आणि राजकीय पक्ष मतदार याद्यांचे योग्य पद्धतीने परीक्षण केले असते, जनतेची सीसीटीव्हीचे फुटेज मागितले ते सुद्धा आयोगाने दिले नाही. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका नंतर विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडल्या चार महिन्यात ७६ लाख मतदार वाढले हे कसे शक्य झाले? याची माहिती आयोगाने दिली नाही.

एरव्ही संपूर्ण पाच वर्षात तेवढी मते वाढू शकत नाही ती सहा महिन्यात कशी वाढली ? असा प्रश्न सामान्य लोकांपुढे पडलेला आहे मात्र त्याचे उत्तर आयोगाने दिलेले नाही.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर लोकसभा निवडणुकीमध्ये जवळपास साडेतीन लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे सांगितले होते. त्यांचा भाचा व इतर नातेवाईकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याची भूमिका नितीन गडकरी यांनी विशद केली होती, ही वस्तुनिष्ठता आहे.

नितीन गडकरींना हरवण्यासाठी अशा पद्धतीचे षडयंत्र रचण्यात आले होते का? असा प्रश्न निर्माण झाला होता. निवडणूक आयोगाने यावर कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. उलट सत्ताधारी पक्षाचे वरिष्ठ नेते जी माहिती सांगतील ती अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत का?

मत चोरीच्या बाबतीत विरोधी पक्षांची एकजूट भारतीय लोकशाही शासन व्यवस्था मजबूत करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. जवळपास ३०० खासदारांनी मोर्चा काढला. मात्र पोलिसांनी मोर्चा अडवून धरला. मतदार यादीची साफसफाई करा... दुबार व बोगस मतदार काढा... हा मोर्चाचा मूळ उद्देश होता. मात्र खासदारांच्या मोर्चाला दाबण्याचा प्रयत्न केला गेला.

ही लढाई साधी आणि सोपी नाही. ही लढाई रस्त्यावर लढण्याची खरी आवश्यकता आहे, असा सूर विरोधी पक्षाने लावला. आज आपल्याला आपली लोकशाही मूल्ये टिकवायची असेल तर रस्त्यावर उतरून शासनाच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करणे आवश्यक आहे.

आपल्या पूर्वजांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जीवाचे रान केले. प्रसंगी मृत्यूला सामोरे गेले, अनेक संकटांचा सामना केला, तेव्हा कुठे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि लोकशाही शासन व्यवस्था आपल्या देशात आज रुजू झाली.

आज लोकशाहीच्या प्रमुख संस्थांचा सर्रास गैरवापर केल्या जात आहे, ईडी नावाच्या संस्थेनि कहरच केला जात आहे भाजपामध्ये या व स्वच्छ व्हा.. असा नारा ईडीच्या बाबतीत सर्वमान्य झाला आहे. ईडीची चौकशी नको या सबबीखाली अनेक मात्तबार नेत्यांनी भाजपामध्ये पक्ष प्रवेश केल्याची उदाहरणे आहेत.

मत चोरी हा भयानक प्रकार पुढे आलेला आहे बिहारमध्ये ६४ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. त्यातही काही जिवंत लोकांची नावे वगळण्यात आलीत. राहुल गांधींनी मृत दाखवण्यात आलेल्या मतदारासोबत फोटो शेअर केला. यावरून निवडणूक आयोग कशा पद्धतीने देशात कार्य करीत आहे, याचा अनुभव सुज्ञ नागरिकांना यावा. देशाची लोकशाही वाचवायची असेल शासकीय संस्थांनी पारदर्शीपणे कार्य केले पाहिजे अशी आर्त हाक सर्वसामान्य माणूस देत आहे.

■ ■ ■

# कर्म- भक्तीयोगी संत सेना महाराज



संत सेना महाराज व्यवसायाने न्हावी होते, म्हणून 'सेना न्हावी' म्हणून वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे. आपल्या वंशपरंपरागत न्हाव्ह्याचा व्यवसाय सेवा म्हणून करताना संत सेनांनी भक्ती मार्गही मोठ्या प्रेमाने, श्रद्धेने चोखाळला.

इतर संताप्रमाणे जातीभेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून प्रत्येकांची सेवा करण्याची तयारी संत सेना महाराज आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून करीत होते.त्यांच्या कार्य कृतीव्दारे त्यांचा परमार्थ दृष्टीस पडतो.

संत ज्ञानदेव- नामदेवांचे स्थान वारकरी संप्रदायात अतिउच्च पातळीवर असताना संत सेनांचे कार्य महान भक्ति परंपरेला वाहून घेणाऱ्या संत मंडळींच्या प्रभावळीतील आहे.शिवाय संत सेनांचे परमार्थिक कार्य विशेष उठून दिसते.

*आम्ही वारीक वारीक'*
*करुं हजामत बारीक ''*
*विवेक दर्पण आयना दावू '*
*वैराग्य चिमटा हालवू ''*
*उदक शांती डोई घोळू '*
*अहंकाराची शेंडी पिळू ''*
*भावार्थाच्या बगला झाडू '*
*क्राम कोध नखे काढू ''*
*चौवर्णा देऊनि हात '*
*सेना राहिला निवांत ''*

संत सावता माळ्यांप्रमाणेच संत सेना महाराजांचा कर्म आणि भक्तीयोगाचा संयोग दृष्टीस पडतो;आणि तोही संत वाङ्मयातून स्पष्ट होतो. उपरोक्त अभंगरचनेचा भावार्थ लक्षात घेता संत सेना महाराज नाभिकांचा व्यवसाय करताना सामान्यनिकांच्या मनातील बारीक -सारीक विकार, अहंकाराची हजामत करण्यासाठी तीव्र मनिषा व्यक्त करतात.

ते विवेकाचा आरसा दाखवून वैराग्याच्या चिमट्याने मनातील वाईट गोष्टी दूर करतील. शांतीरुपी उदकाने त्यांचे डोळे धुतील. अहंकाराची शेंडी पिळतील. भावार्थाच्या बगला झाडून काम, क्रोधांसारख्या षड्विकारांना दूर करतील. शेवटी चौवर्णांना म्हणजेच सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्र आणून शांतपणे राहतील, हे सद्गुण आणि सामर्थ्य संतांच्याठाई असतात.

जणू संतांचा स्थायीभावचं मानावा. एकंदरीत संतांच्या अभंगरचना समाजाला भक्तीचा सोपान, दुष्ट विचारांपासून अलिप्त ठेवते. दूषित मनाचे क्षालन आणि आत्मिक उन्नतीसाठी असतात.

संत सेना विठ्ठलाचे परमभक्त. भगवंताचा कृपाप्रसाद आणि आशीर्वादाचे दान पदरी पाडण्याचे एकमेव साधन म्हणजे नवविधा भक्तींपैकी 'नामस्मरण' भक्ती होय. श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणात संत सेना दंग राहत असत.

संत नामदेवांप्रमाणे संत सेनांनी सुद्धा उत्तर भारतापासून तर महाराष्ट्रपर्यंत तीर्थाटने करून भक्ती परंपरा समृद्ध केली. ते नेमाने पंढरीची वारी करायचे. पंढरीच्या वारीवर त्यांचे अनेक अभंगे प्रसिद्ध आहेत.संत नामदेव, ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव,चोखामेळा, जनाबाई या संतांच्या समकालीन संत होते.

या संतांचा सहवास सेनांना लाभलेली मोठी मिळकत मानली पाहिजे. महान संतांच्या सहवासाने ते स्वतःला भाग्यवंत समजतात. संत ज्ञानेश्वरांमुळे मी घडलो असेही मानतात. संत ज्ञानेश्वरांना ते गुरु मानतात,अशा आशयाची एक अभंगरचना सुद्धा आहे.

ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारुं'
उत्तरील पैलपारुं ज्ञानदेव ''
ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता
तोडील भवव्यथा ज्ञानदेव ''
ज्ञानदेव माझे सोयरे धायरे '
जिवलग निधरि ज्ञानदेव ''
सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान'
दाविली निज खूण ज्ञानदेवे ''

संत सेना महाराजांच्या बाबतीत चरित्रकारांनी त्यांचा जन्म महाराष्ट्रा बाहेर झाला आहे असे म्हटले आहे. परंतु त्यांचा अधिकाधिक काळ हा महाराष्ट्रामध्ये सक्रिय राहिला. उत्तर भारतातील राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश प्रांतात त्यांची तीर्थाटने झालीत.

शेवटी मध्य प्रदेशात बांधवगड येथे विरक्तवृत्तीने राहून पांडुरंगाच्या नामस्मरण करीत राहिले व तिथेच निराकाराची समाधी लागली. संत सेना महाराजांच्या जीवन यात्रेच्याच्या समाप्तीला संत निळोबारायांनी रचलेली अभंगरचना पुढीलप्रमाणे आहे.

*जय जयाजी विष्णूदासा '*
*भक्तीभाव तुझा कैसा ''*
*जन्मोनि न्हाव्हीयांच्या वंशी'*
*भक्ती केली तूवा भोळी ''*
*प्रत्यक्ष पूर्णब्रम्ह दावी '*
*राजयासी आरसा ''*
*दावियेले कौतुक '*
*देव पूजेचिये वेळी ''*
*श्रावण वद्य द्वादशी '*
*सेना बैसला समाधीसी ''*
*निळा शरण प्रेमभावे '*
*विष्णुदास सेनियासी ''*

■ ■



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote@gmail.com

# अजातशत्रू व्यक्तिमत्व : आर आर पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील ऊर्फ आर आर पाटील यांची १६ ऑगस्ट रोजी जयंती होती.

आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच सामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

१६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंतदादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले.

कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे २१ वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या.

१९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते.

गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते.

आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल.

■ ■ ■••••••



## स्वयंपाकघरातील मसाल्यांकडे करू नका दुर्लक्ष
# ते आरोग्यासाठी आहेत खजिना

भारतीय स्वयंपाकघर हे केवळ चवीचाच नाही तर आरोग्याचाही खजिना मानला जातो. स्वयंपाक करताना आपण अनेकदा चव वाढवण्यासाठी मसाल्यांचा वापर करतो. तर हे मसाले आपल्या आरोग्यासाठी इतके फायदेशीर आहे की त्यांचे औषधी गुणधर्मही काही कमी नाहीत.

विशेषतः जिरे, हळद, धणे, हिंग, ओवा, आले, दालचिनी, लवंग आणि काळी मिरी हे मसाले आपल्या आरोग्यासाठी अमूल्य ठरतात. चला तर मग आजच्या लेखात आपण जाणून घेऊयात की कोणते मसाले आपल्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

**हळद आरोग्यासाठी उत्तम** : हळद ही भारतीय घरांमध्ये जवळजवळ प्रत्येक पदार्थ बनवताना वापरली जाते. केवळ त्याचा रंगच नाही तर त्यात असलेले करक्यूमिन जळजळ कमी करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. हिवाळ्यात हळदीचे दूध आपल्यासाठी अधिक फायदेशीर ठरते, परंतु लक्षात ठेवा की ते जास्त प्रमाणात सेवन केल्याने कधीकधी किडनीच्या समस्या उद्भवू शकतात.

**पचनक्रियेचा साथीदार जिरे** : जिरे हे केवळ चवीसाठीच चांगले नाही तर पचन सुधारण्यास आणि गॅस आणि अपचन कमी करण्यास देखील मदत करते. जिरे तव्यावर भाजून त्याचे सेवन करणे किंवा जेवणात वापरून देखील सेवन करावे. रिकाम्या पोटी जिरे पाणी प्यायल्याने पचन सुधारते.

**धणे पावडर ताजेपणा आणि संतुलन यांचे मिश्रण** : धणे केवळ अन्न हलके आणि सुगंधित करत नाही तर त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. ते रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास मदत करते. पोळ्या, भाज्या आणि ग्रेव्हीमध्ये धणे पावडर वापरल्याने चव आणि आरोग्य दोन्ही वाढते.

**हिंग आणि ओवा पोटाचे रक्षण करते** : गॅस, ॲसिडिटी, अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांसाठी हिंग आणि ओव्याचा वापर फार पूर्वीपासून केला जात आहे. हिंगमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात आणि ओव्यामधील थायमॉल तेल पोटातील अतिरिक्त गॅस काढून टाकण्यास मदत करते.

**आले आणि दालचिनी रोगांचे प्रतिबंधक**

आले पचनसंस्था मजबूत करते आणि पोटफुगीपासून आराम देते. पचन सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी दालचिनी प्रभावी मानली जाते.

**लवंग आणि काळी मिरी** : लवंग आणि काळी मिरी हे केवळ अन्नाची चव वाढवण्यासाठीच नाही तर रक्ताभिसरण सुधारण्यासाठी देखील वापरले जातात. थोड्या प्रमाणात लवंग आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तर काळी मिरीमध्ये पचन सुधारण्याची शक्ती असते. भारतीय स्वयंपाकघरातील हे मसाले केवळ चव वाढवतातच असे नाही तर आपले आरोग्य, पचन, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

दररोज हळदीचे दूध, स्वयंपाकात जिरे किंवा धणे वापरणे, हिंग आणि ओव्याचे सेवन करणे यासारखे छोटे बदल तुमचे आरोग्य अनेक पद्दीने सुधारू शकतात.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### शेतकरी कर्जमाफीसाठीच निधी नाही का?

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या विविध संघटनांसह विरोधी पक्षातील आमदार सातत्याने करीत असताना महायुती सरकार अद्यापही घोषणा करीत नाही.

विदर्भासह राज्याच्या सर्वच भागातील शेतकरी कमालीचे अडचणीत आले आहेत. आता तर अतिवृष्टीने शेतात पेरलेले पीक नष्ट होत असून, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यातही कर्जाचा डोंगर आहे तो आहेच. अशा स्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री आणि महायुतीचे नेते सांगतात की योग्य वेळी कर्जमाफी करू. ही योग्य वेळ म्हणजे कोणती? निवडणुकीची संधी साधून कर्जमाफी दिली जाणार आहे का? म्हणजे सगळा खेळ हा मते मिळविण्यासाठी आणि सत्तेसाठी चालला आहे तर.

राज्यातील आमदारांचे पगार, भत्ते, फुकट प्रवास, मुंबईत राहण्याची व्यवस्था, दौरे आणि अन्य अनुषांगिक बाबीवर कोट्यवधीचा खर्च करण्यासाठी सरकारकडे निधी आहे. लाडक्या बहिणीसाठी निधी आहे. परंतु, या अन्नदात्यासाठी सरकारकडे निधीची उणिव भासते, हे सर्व संतापजनक आहे. सरकारने शेतकऱ्यांना प्राधान्याने कर्जमाफी द्यायला हवी.

■ पुंडलीक ठाकरे, वर्धा.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### लय झालं..!

ये रे ये रे पावसा
तुला देतो पैसा
असं न म्हणताही
तू आलास कसा?

तांडवनृत्य करूनी
कां घातले थैमान
भुईसपाट झाला ना
जगाचा पोशिंदा किसान ..

जीवनदाता ऐसी
तुझी जगी किर्ती
निष्ठूरतेने पुराचे
बळी घेशील किती?

पावसा रे पावसा
तु लई थकलास
आता विश्रांती घे
एक महिना झकास ..

## जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

# अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करा : जिल्हाधिकारी

▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :

अतिवृष्टीने नुकसान झालेल्या घरे, शेतीक्षेत्राचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. प्रत्येक नुकसानाची व्यवस्थित नोंद घ्यावी. मदतीपासून एकही शेतकरी वंचित राहता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले.

जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी मूर्तिजापूर तालुक्यातील कंझारा, लाखपुरी, रसूलपूर आदी गावांना भेट देऊन तेथील शेती क्षेत्राची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, तहसीलदार शिल्पा बोबडे, संबंधित यंत्रणांचे अधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिका-यांनी



ठिकठिकाणी प्रत्यक्ष नुकसानग्रस्त क्षेत्रात, शेतात पोहोचून पिकांची पाहणी केली, तसेच शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे जाणून घेतले.

व पंचनाम्याची प्रक्रिया जलदगतीने राबविण्याचे निर्देश यंत्रणांना दिले. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, शेतपीक, फळ बागांचे जिथे जिथे नुकसान झाले, त्या सर्व बाबींची तपशीलवार नोंद घेऊन नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत व त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा. भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील काही दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे.

# अतिवृष्टी व नैसर्गिक आपदांचे ताबडतोब पंचनामे करून शासनास पाठवा : आ. रणधीर सावरकर

**अतिवृष्टी व ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे तसेच सर्वच घटकांचे अतोनात नुकसान झाले आहे याचे ताबडतोब पंचनामे करून नैसर्गिक आपदा समजून सर्वांना पुरेपूर मदत मिळेल याची खबरदारी घेत तसे अहवाल शासनास ताबडतोब पाठविण्यासाठी सर्वच विभागांनी कामाला लागावे असे निर्देश आ. रणधीर सावरकर यांनी दिलेत.**



▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :

अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले असून रस्ते, नाले पूल नादुरुस्त वीज, पुरवठा खंडित झाला आहे यासंदर्भात यंत्रणेने तसेच आरोग्य विभागाने रोगराई पसरू नये या दृष्टीने उपाययोजना तातडीने करावे असे निर्देश आमदार रणधीर सावरकर यांनी दिले. उपविभागीय तहसील कार्यालयात आज अकोला तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भावना तसेच अधिकाऱ्यांची अडचण समजून घेण्यासाठी तहसील कार्यालयात कृषी विभाग जिल्हा परिषद महसूल विभाग वीज वितरण कंपनी सार्वजनिक बांधकाम विभाग पंचायत समिती अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन तातडीने समस्या नीरा करण्याचे आदेश दिले.

अकोला तालुक्यातील आठ मंडळात फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्या असून ५० टक्के च्या वर शेती चे नुकसान झाले तसेच पाच तालुक्यात सुद्धा नुकसान झाले असून त्याचे सर्वे करून अहवाल त्वरित शासनाकडे सादर करा तसेच अनेक शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे मिळाले नाही नुकसान भरपाई मिळाली नाही त्याची सुद्धा पाठपुरावा करून त्यांना त्वरित देण्यात यावे असे निर्देश दिले घुसर परसोबळे , दहिगाव गावंडे कोलखेड जागीर सह मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# अंबोडा येथे घराची भिंत पडून चिमुकल्या शर्वीचा दुर्दैवी मृत्यू

▪अकोट,दि १९ (प्रतिनिधी) :

ग्राम अंबोडा येथे वार्ड क्रमांक दोन मधील रहिवासी प्रवीण प्रकाश शिरसाट यांच्या घराची मुख्य भिंत रविवारी दुपारी पडली. भिंतीखाली त्यांची ३ वर्षीय मुलगी शर्वरी खेळत असताना तिचा भिंतीखाली दबून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने शोककळापसरली. आणि गरीब कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.तिचे आजोबा शंकर शिरसाट व वडील प्रवीण शिरसाट यांनी तिला तात्काळ अकोट ग्रामीण रुग्णालय मध्ये दाखल केले. परंतु डॉक्टरांनी शर्वीला मृत घोषित केले. घटनास्थळी पटवारी संदीप इ देऊळकर, ग्रामीण पोलिस स्टेशनचे निरीक्षक किशोर प जुनगरे, बीट जमादार ठोसरे दाखल झाले. तपास अकोट ग्रामीण पोलीस करीत आहे.



शिरसाट परिवाराने प्रशासनाला मदतीची मागणी केली आहे. येथे वार्ड क्र. दोन मध्ये रविवार दुपारला शिरसाट भाला गांच्या राहत्या घराची भिंत पडून यामध्ये चिमुकल्या शरवी चा मृत्यू व घराची झालेल्या डझळीची तहसील व महसूल भागाने परिवाराला आवरण्याकरता मदत द्यावी.

# जे.सी.आय.प्रियदर्शनी तर्फे डॉ.विशाल कोरडे यांचा सत्कार



▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :

स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार व आरोग्यासाठी संपूर्ण भारतभर कार्य केले जात आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल संपूर्ण भारतातील सामाजिक संस्था घेत आहेत. ✻अकोल्यातील जे सी आय न्यू प्रियदर्शनी तर्फे दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ.विशाल कोरडे यांच्या दिव्यांग क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. माहेश्वरी भवन येथे आयोजित या कार्यक्रमात एम.स्केअरचे मयंक थानवी,सुधीर खंडेलवाल,आरती पनपालीया, शारदा लखोटिया,सिंधू पवार,स्वाती राठी, मीना टावरी, मोनिका राठी, प्रेरणा चांडक व डॉ. विशाल कोरडे यांची मंचावर उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या प्रत्येक सामाजिक उपक्रमात आपण सहकार्य करणार असल्याचे घोषित केले . आरती पनपालिया यांनी जे सी आय तर्फे दिव्यांग सोशल फाउंडेशन व डॉ.विशाल कोरडे करीत असणाऱ्या कार्यात आम्ही नेहमी सहभाग नोंदवू असे आश्वासन दिले . समाजातील विविध सामाजिक संस्था व महिला मंडळाने दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून समाजसेवा करावी.

असे मत डॉ.विशाल कोरडे यांनी व्यक्त केले . ज्या ✻दिव्यांगांना रोजगार आणि उपक्रमात सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क

# हर हर महादेवच्या जयघोषात शहरभर काढण्यात आली भव्य कावळ शोभायात्रा

▪तेल्हारा,दि १९ (प्रतिनिधी) :

गौतमेश्वर नगरीत ( तेल्हारा ) श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही हर हर महादेवाच्या गजरात शहरातील मुख्य मार्गाने ढोल ताशांच्या गजरात काढण्यात आलेली भव्य शोभायात्रा उत्साह, भक्तिभाव आणि ऐक्याचे दर्शन घडवून गेली. शहरातील मुख्य मार्गाने शोभायात्रा निघाली असता हजारो भाविकांनी सहभाग नोंदवत ङ्हर हर महादेव च्या जयघोषाने संपूर्ण गौतमेश्वर नगरी दुमदुमून गेली होती.श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारी तेल्हारा शहरातील कावडधारी शिवभक्तांकडून शहरातील मुख्य मार्गाने भव्य शोभायात्रा करण्यात आलीशहरातील प्रत्येक चौक-



चौकात शिवभक्तांचे गुलाल, फुलांची उधळण करून आणि पाणी, फराळ वाटप करून भव्य स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी सजवलेले मंडप, रांगोळ्या व विद्युतरोषणाईने शोभायात्रेची शोभा अधिकच खुलून दिसली. डीजे, ढोल-ताशांच्या गजरात शिवभक्त नृत्य करत पुढे सरकत होते.

कावळधारी शिवभक्तांनी काढलेल्या या भव्य शोभा यात्रेमध्ये सहा मंडळांचा सहभाग होता त्यामध्ये गौतमेश्वर महादेव मंडळ, जुने शहरवासी मंडळ, एक नंबर वासी मंडळ, एकता मंडळ, जय भवानी मंडळ आणि न्यू भवानी मंडळ अशा सहा प्रमुख मंडळांचा सहभाग होता. प्रत्येक मंडळाने आकर्षक रथ, महादेवाची मूर्ती बजरंग बली ची मूर्ती हरिहर व शिवशंकरांच्या झांज-पथकांसह आपली परंपरा आणि भक्तिभाव प्रकट केला.

शोभायात्रेत सर्व वयोगटातील शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पायात चप्पल न घालता, डोक्यावर भगवे फेटे व भगव्या वेशभूषेत तरुण मंडळींनी परंपरेला अनुसरून सहभाग घेतला. मिरवणुकीत पोलीस प्रशासनाचा योग्य बंदोबस्त असल्यामुळे शिस्तबद्ध वातावरणात मिरवणूक पार पडली .

## शाळांना जिल्ह्यातील सुटी जाहीर करावी !

**अकोला :** अकोला जिल्ह्याला येलो अलर्ट पावसाची शक्यता लक्षात घेता अकोला जिल्ह्यातील शाळांना जिल्हाधिकारी यांनी सुटी जाहीर करावी, अशी मागणी भाजपाचे प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांनी केली आहे. मुंबईसह १६ राज्यांतील जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी, ढगफुटीसारखे प्रकार होणार असल्याची माहिती हवामान खात्याने दिल्यामुळे मुंबईसह इतर जिल्ह्यांनी शाळांना सुटी जाहीर केली आहे. त्याच धर्तीवर अकोला जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहीर करावी, जेणेकरून अतिवृष्टीच्यापावसापासून विद्यार्थी आपल्या घरी सुखरूप राहू शकतात, अनेक विद्यार्थी आपल्या सायकलवरून तसेच गाड्यांमधून प्रवास करतात त्यामुळे सुटी जाहीर करावी. शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडे जिल्हाधिकाऱ्यांनी प्राथमिकतेने लक्ष द्यावे.

# कुत्रीम पाय नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :

दिव्यांगांसाठी जयपुर फूट प्रकल्प म्हणजे मानवतेच्या सेवेत सदैव कार्यरत असणाऱ्या लायन्स क्लब पुणे सुप्रीम व इंडियन रेडक्रॉस सोसायटी या संस्थांच्या मानवीय सेवेची पावती असून असे उपक्रम प्रेरणास्पद असल्याचे प्रतिपादन रमाकांत खेतान व शंतनु जोशी यांनी केले.

लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम व रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने स्थानीय जि प कर्मचारी भवनात प्रारंभ झालेल्या जयपुर फूट दिव्यांग नोंदणीचे उद्घाटन करताना ते बोलत होते. पहिल्याच दिवशी शंभरच्या वर लाभार्थ्यांची नोंद व तपासणी होणे हीच या मानवतेच्या कार्याची खरी पावती असल्याचे अकोला जनता बँकेचे अध्यक्ष रमाकांत खेतान यांनी सांगितले.अकोला अर्बन बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी यांनी या महान कार्यासोबत थॅलेसेमिया रुग्णांसाठी संस्थांनी कार्य करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.स्व भाऊसाहेब फुंडकर यांच्या सर्वव्यापी कार्यानुसार त्यांच्या ७५ व्या जयंती निमित्त होणारे हे कार्य स्तुत्य आहे असेही ते म्हणाले.मानवतेची सेवा लायन्स क्लबच्या उद्देशानुसार आयोजित या प्रकल्पाची माहिती लायन्स क्लब पुणे सुप्रिमच्या अध्यक्षा संजना झंवर यांनी दिली. तर अकोल्यात जन्मलेले जागतिक कीर्तीचे चित्रकार स्व अंबादास खोब्रागडे यांचे नाव या प्रकल्पाला जोडले गेल्याबद्दल त्यांची नात रजनी अंबादे यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत चेअरमन डॉ किशोर मालोकार,सीए मनोज चांडक व कपिल रावदेव यांनी केले.डॉ मालोकार यांनी आयोजनाची भूमिका सांगितली.यावेळी प्रकल्प प्रमुख आर्कि रामेश्वर मनियार,अॅड सुभाषसिंह ठाकूर,प्रशांत राठी,अॅड महेंद्र साहू, अॅड सुभाष मुंगी,अमर गौड आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# आरोग्य विभागाकडुन लाभार्थ्यांना कुटुंबातील सदस्यां प्रमाणे वागणुक

▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :

शासन व वरिष्ठांकडून मिळणारे प्रोत्साहन आणि तरून होतकरु अधिकारी व कर्मचारी यांचे मुळे आज तळागाळापर्यंत आरोग्य सेवा दिली जात आहे याचेच एक उदाहरण दिनांक १५ ऑगस्ट स्वतंत्रता दिनी अकोला जिल्हा बार्शीटाकळी तहसील अंतर्गत ग्राम झोडगा येथे ध्वजारोहनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर गावातील आशाताईने एका बाहेरगावाहून आलेल्या माहेरवासीन गरोदर मातेच्या पायावर सुजन असल्याची माहिती डॉ अजय अहिरकर समुदाय आरोग्य अधिकारी यांना दिली, त्यांनी सदर गरोदर माता सौ कोमल स्वप्नील शेंदुरकर वय २१ वर्ष खेप पहिली राहणार कारंजा हिची आरोग्य तपासणी केली असता तिच्या दोन्ही पायावर सुजन होती सोबतच रक्तदाब वाढला होता, तिची रक्त, लघवीची तपासणी केली असता धोक्याची लक्षणे आढळली. तिला कोणत्याही क्षणी झटके येण्याची शक्यता आहे, त्यामुळे गरोदर माता व बाळाच्या जीविताला धोका होऊ शकतो ही बाब गरोदर माता व नातेवाईकांना समजाऊन सांगितली. रुग्णाला सोबत प्राथमिक आरोग्य केंद्र महान येथे गेले असता वैद्यकीय अधिकारी डॉ रुचिता बोंबटकर मॅडम यांनी तिची तपासणी करून प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथे संदर्भीत केले वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतः रुग्णाला खर्चाकरीता काही पैसे दिले. डॉ अजय अहिरकर यांनी रुग्णाला स्वतःच्या खाजगी वाहनाने (Celerio चक ३० BL> ५६९८) जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथे घेऊन गेले व पुढील उपचारासाठी दाखल केले. दिनांक १६ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता सदर गरोदर मातेचे सिझेरियनद्वारे प्रसुती करण्यात आली. तीचा जीव सध्या धोक्याच्या बाहेर आहे. बाळाचे वजन कमी (२ किलो) असल्यामुळे त्याला छखउण (काचपेटी) मध्ये ठेवण्यात आले आहे. यावेळी डॉ रुचिता बोंबटकर, डॉ अजय अहिरकर, आरोग्य सेविका श्रीमती आम्रपाली जाधव व श्रीमती माहुलीकर हे हजर होते.याघटनेमुळे सदर गरोदर मातेचे नातेवाईक सहकारी यांच्या कडुन समाधान व्यक्त केले जात आहे आणि शासकिय आरोग्य यंत्रनेवरील विश्वासाहार्यता वाढली आहे याबद्दल डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अधिकारी कर्मचारी यांचे कौतुक केले आहे.

## वंचितने केले कावड भक्तांचे स्वागत !

**अकोला** : शहरामध्ये अनेक वर्षापासून श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी गांधीग्राम येथील पूर्णा नदीवरून जल घेऊन अनेक कावड भक्त अकोल्यातील प्रसिद्ध असलेल्या राजराजेश्वरमंदिरामध्ये जलाभिषेक करतात. गांधीग्रामवरून जल घेऊन राज राजेश्वर मंदिरात येणाऱ्या कावड भक्तांचे वंचित बहुजन आघाडीकडून जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे व गजानन गवई यांनी स्वागत केले. कावड भक्तांचे स्वागत करण्याकरिता वंचितचेकार्यकर्ते महेंद्र डोंगरे यांनी स्टेज उभारून येणाऱ्या कावड भक्तांचा स्वागत कार्यक्रम आयोजित केला.

**Name Change**

**Old Name :** Mohammed Ishraque Ahmed
**New Name :** Mohd Ishraque Ahmad Mohd Wazir
**Old Father Name :** Mohammed Wazir Mohammed Tavakkal
**New Father Name :** Mohd Wazir Mohd Tavakkal
Mother **Old Name :** Kalimunnisa Mohammed Wazir
**Mother New Name : Kalimunnisa Mohd Wazir**
**Spouse Old Name : Zakiya Shamim**
**Spouse New Name :** Zakiya Shameem Mohd Ishraque Ahmad
Passport No. K1742507
Address: Deodi Maidan Patur Tq Patur Distt.Akola 444501 Maharashtra (India)

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
----From-----
**AISHWARYA DEONATH SIRSAT**
------TO-------
**AISHWARYA DEVNATH SIRSAT**
My Residential Address is - At. Post Warur Tq. Akot Dist. Akola 444101

**Name Change**

**Old Name :** Zakiya Shameem Mohd Ishraque Ahmed
**New Name :** Zakiya Shameem Mohd Ishraque Ahmad
**Spouse Old Name :** Mohd Ishraque Ahmed
**Spouse New Name :** Mohd Ishraque Ahmad Mohd Wazir
Passport No. K1742626
Address: Deodi Maidan Patur Tq Patur Distt.Akola 444501 Maharashtra (India)

# अकोटमध्ये भूमी फाउंडेशनचा ऐतिहासिक कार्यक्रम साजरा

**दिग्गजांची हजेरी,बालगोपालांमध्ये नवचैतन्य, पालकांमध्ये उत्साह**
**'मदत नव्हे कर्तव्य' असे ब्रिदवाक्य असलेल्या भूमी फाउंडेशनचे सर्वत्र कौतुक**





▪अकोट,दि १९ (प्रतिनिधी) :

अकोट मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी नामांकित असलेले भूमी फाउंडेशन यांनी काल नरसिंग महाराज मंदिर येथील सभागृहांमध्ये ऐतिहासिक कार्यक्रम घेऊन अकोटच्या इतिहासात ठसा उमटवला आहे या भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन भूमी फाउंडेशनच्या अध्यक्षा कु.चंचल पितांबरवाले यांनी केले त्यामध्ये जवळपास ६० ते ७० मुलामुलींनी सहभाग घेतला होता यामध्ये लहान चिमुकल्यांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांनीच संगीत, डान्स, व इतर अनेक कलागुणांचे सादरीकरण केले पालकांनी सुद्धा डान्स व गायन मध्ये उस्फुर्त सहभाग घेतला असून शेकडो प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला सध्या स्थितीत कावड यात्रेचे भव्य दिव्य स्वरूप पाहायला मिळत आहे रस्त्यांवर गर्दी आहे प्रत्येक ठिकाणी पोलिसांची वदर्ळ आहे तरीसुद्धा मुलांप्रमाणेच पालकांमध्ये सुद्धा या कार्यक्रमाची उत्सुकता बघायला मिळाली सोबतच या कार्यक्रमाला माजी राज्य गृहमंत्री रणजित पाटील सह नरेशजी भुतडा,डॉ.रहेमान खान,डॉ. विशाल इंगोले,डॉ योगेश गुप्ता,संतोष झुणझुनवाला,गणेश पाचपोर,योगेश वर्मा,हिंम्मत दंदी,विनोद रसे, दीपक गोरे,सुदाम राजदे,गिरीश काळे,अवि पालेकर व अनेक दिग्गजांची हजेरी लाभली या कार्यक्रमामुळे अकोट मधील बालगोपालांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून असा ऐतिहासिक कार्यक्रम यापूर्वी कधी झाला नसल्याच्या प्रतिक्रिया अनेक पालकांकडून व्यक्त करण्यात आल्या सोबतच 'मदत नव्हे कर्तव्य' असे ब्रिदवाक्य असलेल्या भूमी फाउंडेशनच्या कर्तव्यदक्ष तथा सर्वेसर्वा कु.चंचल पितांबरवाले यांचे आभार मानले.

यावेळी पत्रकार बंधू उपस्थित होते व सर्वश्री भूमी सदस्य अमोल पवार,अगस्ती ठाकूर,जितेश गलांडे,सविता घाटे,संदेश चोंडेकर,प्रशांत बेराड,सुमेध खंडारे,स्मिता महल्ले,सचिन वानखडे,मिनाक्षी आडे,शिल्पा राठी,अनुप चांदणे,शुंभागी



बरेठिया,गौतम मुळे यांनी कार्यक्रम करिता परिश्रम घेतले तसे परीक्षक म्हणून सौ.चंचल योगेश गुप्ता व पुजा रघुवंशी लाभल्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रविणकुमार पुडगे,प्रकाशजी गायकी व अमोल पवार यांनी केले तर आभार भूमीच्या अध्यक्षा कु.चंचल पितांबरवाले यांनी मानले पारितोषिक अ गट सोलो प्रथम: मानसी खाडे द्वितीय: रिदम जैस्वाल तृतीय :आर्या ठेलकर, युग हातेकर ब गट सोलो प्रथम: परीक्षित द्वितीय: जानवी पाटील तृतीय: फारूक शेख,प्राची धांडे गृप प्रथम: शिवकन्या गटद्वितीय:राजस्थानी गट तृतीय:प्रेरणा गट,राजलक्ष्मी गट हे विजयी ठरलेत.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# महाभियोग आणणे खरंच शक्य आहे का?

सध्या देशात लोकसभेचे विरोधी पक्ष नेते असलेले राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणावर मतदार अचानक वाढल्याचे देखील शंका व्यक्त केल्याने इलेक्ट्रॉनिक डेटा देण्यासाठी निवडणूक आयोग टाळाटाळ करीत असल्याचे सांगितले आहे.

त्याचबरोबर माहिती मागितले असता मतदारच्या गोपनेतीवर प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी निवडणूक आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषद मध्ये स्पष्ट केले. या सर्वांमध्ये जेव्हा निवडणूक प्रक्रियेदरम्यान सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले तेव्हा गोपनेतेचा प्रश्न निर्माण झाला नाही का हा प्रश्न देखील तितकाच महत्त्वाचा आहे. एकीकडे निवडणूक आयोगावर आरोप झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक निवडणूक आयोगाची बाजू घेत राहुल गांधींना उत्तर देण्याचा प्रयत्न केला मात्र नेटकरांनी त्यांना दिलेल्या उत्तरामुळे ते आता मात्र याप्रकरणी शांत असल्याचे दिसत आहे. त्यांची जागा आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र याच सर्व प्रकरणावर आता केंद्रातील विरोधी पक्ष हा निवडणूक आयुक्त यांच्यावर महाभियोग म्हणजे काय, त्याची प्रक्रिया कशी असते, भारतातील त्याचा इतिहास, व त्यातील अडचणी यावर शोधक दृष्टिकोनातून या लेखात प्रकाश टाकलेला आहे.

-------------------

महाभियोग आणण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. नेमकं महाभियोगाची प्रक्रिया काय आहे आणि ती कशी पार पाडली जाते हे एक लिस्ट प्रक्रिया असली तरी यासाठी संख्याबळ असणे तितकेच आवश्यक आहे.

निवडणूक आयोगाने आपल्या प्रेस मध्ये असे म्हटले की एक दोन तक्रारी असल्या तर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी त्या तक्रारी सोडू शकतात. मात्र लाखो तक्रारी असल्याने त्या विना पुराव्या कशा सोडवल्या जाईल असे त्यांनी म्हटले. मात्र एकीकडे निवडणूक आयोग करोडो लोकांच्या घरी जाऊन मतदान वाढविण्याचा दावा करीत आहे तर दुसरीकडे या लाखोच्या तक्रारी सोडवण्यासाठी ते का तत्पर्त दाखवत नाही हा देखील प्रश्न आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात इंडिया आघाडी महाभियोग आणणार आणि जर हे खरं झालं तर भारताच्या इतिहासात निवडणूक आयुक्तांच्या विरोधात पहिल्यांदा अशी प्रक्रिया पार पडणार?



बादल डकरे
९९७५८४४६३८

काल झालेल्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेनंतर विरोधी पक्षांनी ही भूमिका घेतलेली आहे. इंडिया आघाडीकडे बहुमत नसतांनाही अश्याही परिस्थितीत जर महाभियोग आणत असेल तर विरोधी पक्ष देशाचे संविधान संरक्षीत करण्यास समर्थ आहे. हेच यातून दिसून येते.

संविधानाच्या कलम ३२४(५) नुसार मुख्य निवडणुक आयुक्ताला पदावरून काढण्याची प्रक्रिया आहे. मुख्य निवडणुक आयुक्तावर महाभियोग खटला सुरु करण्यासाठी करण्यासाठी विरोधीपक्षाकडे लोकसभेत १०० आणि राज्यसभेत किमान ५० खासदार यांचे अनुमोदन असावे लागते आणि एवढी संख्या विरोधीपक्षाकडे आहे. परंतु, महाभियोगची कार्यवाही होण्यासाठी दोन्ही सभागृहाचे प्रत्येकी दोन तृतीअंश बहुमत असावे लागते आणि ते विरोधी पक्षांकडे नाही.

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोग ची लढाई तांत्रिकदृष्ट्या जरी सोपी नसली तरी ही लढाई दोन प्रकारे लढल्या जात आहे. एक म्हणजे संसदेच्या दोन्हीही सभागृहातून आणि दुसरे म्हणजे रस्त्यावरून.

लोकशाहीतील प्रत्येक संस्था व पद ही जनतेच्या विश्वासाने चालते. परंतु या संस्थांमध्ये असलेल्या अधिकारांचा गैरवापर झाल्यास त्या व्यक्तीस जबाबदार धरणे अत्यावश्यक असते. अशा वेळी महाभियोग ही प्रक्रिया वापरली जाते.

महाभियोग ही एक घटनात्मक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे एका उच्चपदस्थ व्यक्तीस - विशेषतः राष्ट्रपती, न्यायाधीश, इ. यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी कायदेशीर कारवाई केली जाते.

ही प्रक्रिया केवळ गंभीर आरोप असल्यासच वापरली जाऊ शकते, जसे की संविधानाचे उल्लंघन, भ्रष्टाचार, किंवा वर्तनाशी असंगत आचरण.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ६१ नुसार, राष्ट्रपतीवर महाभियोग चालविण्याची प्रक्रिया संसदेच्या दोन्ही सभागृहांद्वारे केली जाते. ही प्रक्रिया अत्यंत कठीण व गुंतागुंतीची आहे,

**सूचना प्रस्ताव :** महाभियोग चालवायचा असल्यास प्रथम लोकसभा किंवा राज्यसभेतील किमान १/४ सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांसह लेखी सूचना द्यावी लागते.

**मतदान :** दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताने (किमान २/३ सदस्यांची संमती) महाभियोग मंजूर झाला पाहिजे.

**राष्ट्रपती पदावरून हटविणे :** जर दोन्ही सभागृहांनी महाभियोग मंजूर केला, तर राष्ट्रपती आपोआप पदावरून हटवले जातात.

भारतात आजवर कोणत्याही राष्ट्रपतीवर प्रत्यक्षात महाभियोग यशस्वीपणे चालवला गेलेला नाही. यामागील प्रमुख कारण म्हणजे ही प्रक्रिया खूप कठीण आहे व त्यात राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता असते.

उदाहरणार्थ, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. रामास्वामी यांच्यावर १९९३ मध्ये महाभियोग प्रस्ताव मांडला गेला होता, परंतु तो राज्यसभेत मंजूर होऊ शकला नाही. यावरून स्पष्ट होते की, राजकीय पक्षांच्या मतभेदांमुळे महाभियोग प्रक्रियेला अडथळा येतो.

लोकशाहीत सत्ता विकेंद्रीकरण महत्त्वाचे आहे. जेव्हा सर्वोच्च पदांवरील व्यक्तींच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा उत्तरदायित्व आवश्यक असते. अन्यथा, सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच, महाभियोग ही एक रोखठोक प्रक्रिया आहे, जी त्या व्यक्तीस जबाबदार ठरवते.


महाभियोग प्रक्रिया ही लोकशाहीतील एक संवेदनशील व जबाबदारीची प्रक्रिया आहे. याचा उपयोग राजकीय द्वेषासाठी नव्हे, तर संविधानाच्या रक्षणासाठी व्हायला हवा. केवळ राजकीय फायद्यासाठी जर महाभियोगाचा वापर केला गेला, तर तो संविधानाच्या आत्म्याविरोधात ठरेल.

महाभियोग ही भारतीय लोकशाहीची एक शक्तिशाली, पण दुर्मीळ वापरली जाणारी घटना आहे. सत्तेवर असणाऱ्या व्यक्तींसाठी ही एक गंभीर चेतावणी असते की, त्यांच्या आचरणात जर चुकीचे वळण आले, तर त्यांना जबाबदार धरले जाईल. त्यामुळे महाभियोग ही प्रक्रिया सत्तेचे संतुलन राखण्यासाठी अत्यावश्यक आहे, पण त्याचा वापर अत्यंत सूज्ञपणे व पारदर्शकतेने व्हावा, ही काळाची गरज आहे.

## भारतीय माहिती क्रांतीचे जनक
# राजीव गांधी

आज २० ऑगस्ट, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आज ८१ वी जयंती.

राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले.



भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते.

राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला.

त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले.

लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली.

१९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली.

३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली.

वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला.

स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात.

देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून तो दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# मी.. असे स्पष्ट करतो की, फेसबुक वर मुर्ख बनलो..

फेसबुकवर एक पोस्ट व्हायरल होत आहे मी नाव असे स्पष्ट करतो की माझा फोटो, वैयक्तिक माहिती वगैरे फेसबुक वापरणार नाही रात्री वेळ (अनेकांच्या प्रोफाइल वर) वेगवेगळा, ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आणि स्वतः ची माहिती सुरक्षित राहण्यासाठी बहुतांश फेसबुक वापरणाऱ्या लोकांनी शिक्कामोर्तब केले आहे.

हे बघून खरंच हसु आले आणि स्वतःला सुशिक्षित, हुशार, चतुर समजणारे लोकही स्वतः मेंदूचा वापर करत नाहीत हे बघून त्यांच्या बुद्धीची किवही आली. सदर लेख कोणालाही कमी लेखण्यासाठी अजिबात नाही. परंतु चुकिची फसवी आणि हास्यास्पद पोस्ट लोक सहज फॉरवर्ड करतात. पण एखादी महत्वाची, एखाद्याला फायदा होईल, रोजगार, शैक्षणिक पोस्ट शेअर करायला लोकांना कमी पणा वाटतो आणि बुद्धी तपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्ट फॉरवर्ड करून आपण मेंदूचा वापरच करत नाही हे स्वतः च सिद्ध करून देतो.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

तेव्हा त्या शिक्षणाचा, बुद्धीचा आणि हुशारीचा फायदा नेमका कोणाला हा महत्त्वाचा प्रश्न बाजूला राहतो. फेसबुक वर फिरणारी पोस्ट शंभर टक्के चुकिची आहे. ही चुकिची पोस्ट आहे हे सर्वांना कळते फक्त थोडा मेंदुचा वापर करावा लागतो.

पोस्ट मधील एक एक मुद्दा समजून घेऊया. मुद्दा क्रमांक एक उद्या एक महत्वाचा दिवस आहे ज्यावर रात्री (वेळ)अधिकृत पणे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या वाक्याचा अर्थ तरी करतो कळतो. महत्त्वाचा दिवस म्हणजे नेमकं काय? शिक्कामोर्तब कशावर केला? कोणी केला? शिक्कामोर्तब झालेले कागदपत्रे कुठे आहेत? या प्रश्नांची उत्तरे कोणाकडे ही नाहीत.

मुद्दा नंबर दोन ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आहे. तर कोणत्या टीव्हीवर प्रसारित करण्यात आली? कोणत्या व्यक्तीने बघितली? उत्तर नाही. फेसबुक चे नवीन नियम लागु होतात जे तुमचे फोटो वापरण्याची परवानगी देतात.

फेसबुक चे नवीन कोणते नियम तयार झाले याची यादी कोणाकडे आहे? उत्तर नाही. हा मॅसेज कॉपी करा आणि फेसबुक वर पेस्ट करा जो करणार नाही त्याची फोटो शेअर करायला परवानगी आहे असे समजले जाईल. मॅसेज कॉपी करून फेसबुकवर टाकायचा तेव्हा फोटो चा वापर होणार नाही हे खरे की खोटे नंतर बघु हे मॅसेजचे फॉरमॅट दिले कोणी? उत्तर नाही. गोपनियतेचे उल्लंघन केल्यास केल्यास कायदेशीर परिणाम होऊ शकतात..

गोपनियतेचे उल्लंघन कोण करणार? कायदेशीर परिणाम कसे होऊ शकतात? शिक्षण आरोग्य सरकारने मोफत द्यायला पाहिजे पण हे विकत घेणा?या लोकांना खरंच किती कायदेशीर बाबी माहिती आहेत हा संशोधनाचा प्रश्न आहे. मी मेटाला परवानगी देत नाही असे लिहणा?या लोकांच्या मेंदुची खरचं किव येते. कारण तुम्ही फेसबुकवर प्रोफाइल वर काहीही लिहले तरी काही फरक पडत नाही फक्त आपण बुद्धीने किती गरीब आहोत हेच सिद्ध होते.

चला आपण गोपनियते बद्दल बोलुया. फेसबुकच नव्हे तर इतर कोणतेही अँप नवीन नोंदणी करताना आपल्या कडून परवानगी घेतली जाते. आपल्या हातात असलेला मोबाईल थोडाही सुरक्षित नाही.

फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट नंबर, लोकेशन सह इतर बऱ्याच बाबी वेगवेगळ्या अँपद्वारे वेगवेगळ्या लोकांकडे आहेत. म्हणुनच आपल्याला आपण फोनवर बोलतो ते, मोबाईल बघतो तेच वारंवार समोर येते, जागा बदलली की लोकेशन दाखवते हे याला गुपित म्हणायचे का? आपल्या मोबाईल मध्ये आपण बऱ्याच वेळा माहिती भरतो तर आपले नाव, मोबाईल नंबर, मेल आयडी, बऱ्याच लोकांचे बँक अकाऊंट नंबर आपोआपच येतात. याला गोपनीयता म्हणायचे का? आपल्याला कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य कधी येणार?

अशा पोस्ट द्वारे फक्त आपण आपल्या बुद्धीचा वापर करतो की नाही हे सायबर क्रिमिनल बघत असतात. आपण आपली गोपनीयता आणि बौद्धीक पातळी सार्वजनिक करतो म्हणून अनेक ऑनलाइन फसवणूकीचे प्रकरण वाढले आहेत. गोपनियतेच्या गोष्टी कोण करते तर बाहेर जाऊन चहा जरी पिला तर ते सोशल मिडीयाला शेअर करतात ती गोपनियता? फिरायला गेले तर प्रत्येक ठिकाणची फोटो शेअर करतात, बेडरूम मधील फोटो शेअर करणाऱ्यांनी गोपनियते बद्दल फेसबुक वर लिहणे म्हणजे खरचं बुद्धीची कसोटीच असते.

चुकीच्या, हास्यास्पद ज्यातून आपणच आपली बुद्धी वापरत नाही असे मॅसेज फॉरवर्ड करताना स्वतःची छाती फुगते पण खरचं एखादी प्रबोधनात्मक पोस्ट, एखादी रोजगार, शिक्षण, आरोग्य यासंदर्भात कोणातरी फायदा होणारी पोस्ट शेअर करतांना मात्र कमीपणा वाटतो. एखादी चांगली पोस्ट शेअर झाली तर कोणाचा तरी लाखों रुपयांचा फायदाच होईल म्हणून न पाठवणारे जळकुटे लोक फेक पोस्ट पाठवण्यात माहीर असतात.

मागे अशीच एक पोस्ट व्हाट्सएपच्या संदर्भात फिरत होती. अनेकांनी ती शेअर करून स्वतः ची छाती फुगवली पण स्वतः ची बौद्धिक पातळी सर्वांना दिसली. बऱ्याच वेळा महापुरुषांच्या नावाने पोस्ट येतात हा दोन नंबर तुम्ही मत देऊन एक नंबर वर आना अर्थात एक नंबर व तिन नंबर वर कोण असते हे यांना माहिती नसते आणि हे महापुरुषांना वोट देऊन नंबर देणारे महान विद्वान लोक येथे आहेत.

यातून दुसरे काहीच सिद्ध होत नाही तर फक्त आपण सहज मुर्ख बनु शकतो आणि सारासार विचार करत नाही हेच सिद्ध होते. म्हणून शहानिशा करून, आपली बौद्धिक पातळीवर बघून पोस्ट शेअर झाल्या तर मानसाला किंमत राहते व फसवणूक होत नाही. नाहीतर स्वतःच्या च हाताने स्पष्ट करतो मी मुर्ख बनलो आहे.

■ ■ ■

# राज्यातील कायदा-सुव्यवस्था : नागरिक असुरक्षिततेच्या छायेत

गेल्या काही महिन्यांपासून राज्यात घडणाऱ्या घटनांनी सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कधी हत्तीण, कधी कबूतर, तर कधी मटण या किरकोळ कारणांवरून धार्मिक, जातीय व सामाजिक गटांमध्ये वाद उफाळून हिंसाचाराच्या स्वरूपात रस्त्यावर प्रकट होत आहेत. या हिंसेत निरपराध नागरिक, महिला व तरुणी यांना मारहाण होणे ही गंभीर बाब आहे. समाजातील सौहार्द डळमळीत होत असून नागरिकांना आपण सुरक्षित आहोत का? हा प्रश्न सतावतो आहे.

-------------------

अंमली पदार्थ व शस्त्रास्त्र तस्करीची सातत्याने वाढ होत आहे. तसेच राज्यात अमली पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याची प्रकरणे उघड होत आहेत.

लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्या व खासगी वाहनांतून या तस्करीचे जाळे पसरले आहे. गेल्या काही वर्षांत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज जप्त केले असले तरी त्याच्या मुळावर घाव घालण्यात प्रशासन कमी पडत असल्याचे दिसते.

यात आणखी एक चिंतेची बाब म्हणजे परप्रांतीय लोकांच्या माध्यमातून वाढणारी शस्त्रास्त्र तस्करी. यामुळे गुन्हेगारी टोळ्या अधिक बळकट होत आहेत आणि समाजातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत आहे.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

नागरिकांसाठी दिवसेंदिवस समस्या वाढतच आहेत. कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत असताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही इतर अनेक समस्या कोसळत आहेत. रस्त्यांची दुरवस्था इतकी बिकट झाली आहे की अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सुविधा अपुऱ्या आहेत, औषधांचा तुटवडा भासत आहे.

सामान्य नागरिकांना मूलभूत हक्कांसाठी देखील संघर्ष करावा लागत आहे. समाजातील सौहार्द टिकवणे, नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे व गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे ही गृहखात्याची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र सध्या या सर्व आघाड्यांवर शासन अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. सतत घडणाऱ्या घटनांमुळे सरकारच्या कारभारावर प्रश्?नचिन्ह उपस्थित होत आहे.

त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे. जसे, हिंसा आणि तस्करी रोखण्यासाठी स्थानिक स्तरावर माहिती गोळा करून तातडीने कारवाई करणे गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञान, उपकरणे व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून पोलिस दलाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. ड्रग्ज व शस्त्रास्त्रांवर कठोर नियंत्रण ठेवण्याकरीता वाहतूक मार्गांवर नाकाबंदी, तपासणी मोहिम व कठोर शिक्षा यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. सामाजिक सामंजस्य मोहिम, धार्मिक व जातीय मतभेद टाळण्यासाठी संवाद, जनजागृती व शांती समित्या सक्रिय करणे आणि शेवटी रस्ते व आरोग्य सेवांमध्ये गुंतवणूक केल्यास नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यास असंतोष कमी होईल.

राज्यातील वाढत्या घटना शासनाच्या अपयशाकडेच बोट दाखवत आहेत. सामान्य नागरिक सुरक्षिततेची अपेक्षा करतो, पण त्याऐवजी तोच हिंसा व अराजकतेचा बळी ठरत आहे. त्यामुळे आज गृहखात्याने तातडीने जागे होऊन ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याचे सामाजिक व राजकीय परिणाम गंभीर असतील, हे प्रत्येकाने ध्यानात घेणे आवश्यक आहे.

■ ■ ■

# भविष्यातील विश्वगुरू भारतासाठी शिक्षणाचा मंत्र

आज भारताची शैक्षणिक प्रणाली अनेक पातळ्यांवर यशस्वी ठरली असली तरी, बदलत्या काळानुसार तिच्यात ठोस सुधारणा करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. आपली शिक्षणपद्धती आजही मुख्यतः पुस्तकी ज्ञानावर आधारित आहे आणि प्रत्यक्ष कौशल्य शिकवण्याकडे दुर्लक्ष केले जाते. या कारणामुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पदवी घेतल्यानंतरही बेरोजगार राहत आहेत किंवा अपुऱ्या कौशल्यांमुळे उद्योगक्षेत्रात टिकत नाहीत. IndiaSkills Report 2024 नुसार, देशातील केवळ ४८.७% पदवीधर रोजगारयोग्य आहेत, म्हणजेच दरदोनपैकी एक विद्यार्थी उद्योगाच्या अपेक्षांना अपुरा ठरतो. ही आकडेवारी फक्त काळजीपूर्वक विचार करण्यास भाग पाडणारी नाही, तर शिक्षण क्षेत्रात मूलगामी सुधारणा करण्याची गरज अधोरेखित करणारी आहे.

-------------

आजही अनेक सरकारी महाविद्यालयांत जुना आणि कालबाह्य अभ्यासक्रम शिकवला जातो. मार्क्स मिळवणे हे अजूनही शैक्षणिक गुणवत्तेचं मुख्य परिमाण मानलं जातं, ज्यामुळे केवळ परीक्षांमध्ये चांगले गुण मिळवण्यावर भर दिला जातो, आणि विद्यार्थी क्रिटिकल थिंकिंग, प्रॉब्लेम सॉल्विंग, डिजिटल लिटरेसी आणि इनोव्हेशन यासारख्या महत्त्वाच्या कौशल्यांपासून दूर राहतात. त्याउलट आंतरराष्ट्रीय शिक्षणपद्धतीमध्ये project-based learning, interdisciplinary education And skill certification यावर भर दिला जातो. त्यामुळे आपण भारतीय शिक्षणपद्धतीत केवळ degree पुरविणारी प्रक्रिया न ठेवता capability निर्माण करणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

अभ्यासक्रमाचे वेळोवेळी अद्यतन होणे गरजेचे असले तरी दरवर्षी तो बदलण्याची गरज नाही, परंतु उद्योगधंद्यांमध्ये चालू असलेल्या ट्रेंड्स आणि तंत्रज्ञानाच्या गरजांनुसार त्यात आवश्यक ते बदल करणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, आज AI, data science, cyber security, cloud computing, EV technology अशा क्षेत्रांमध्ये प्रचंड मागणी असताना, बहुतांश शैक्षणिक संस्थांच्या अभ्यासक्रमात या गोष्टींचा उल्लेखसुद्धा नाही. NEP २०२० मध्ये यासंदर्भात काही सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत, जसे की multiple exit options, vocational integration, आणि interdisciplinary learning, परंतु याची अंमलबजावणी अजूनही साठलेल्या सिस्टीममुळे संथगतीने होत आहे.

शिक्षण संस्थांनी इंटर्नशिपला अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनवले पाहिजे. आजच्या काळात प्रत्येक नोकरीसाठी किमान अनुभव मागितला जातो, परंतु तो अनुभव विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये शिकत असतानाच मिळाला पाहिजे. जर इंटर्नशिप अनिवार्य केली गेली, तर विद्यार्थी केवळ सैद्धांतिक नव्हे तर व्यावहारिक ज्ञानातही प्रावीण्य मिळवतील आणि कामाच्या ठिकाणी लगेच स्वतःला सिध्द करू शकतील.

Young India Skills University चं उदाहरण घ्यायचं झालं तर, त्यांच्या पहिल्याच बॅचमध्ये ८२% विद्यार्थ्यांनी उद्योगांमध्ये प्लेसमेंट मिळवली. यावरून स्पष्ट होतं की, इंटर्नशिप आणि कौशल्याधारित शिक्षण हे यशाच्या मूलतत्त्वांपैकी एक आहेत.

तसेच विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केवळ गुणांवर न करता, त्यांचं व्यावहारिक ज्ञान, प्रोजेक्ट्सवर केलेले काम, कमी वेळेत सोडवलेली समस्या, संवाद कौशल्य, आणि टीमवर्क यांच्या आधारे केलं पाहिजे. अनेकदा एखादा विद्यार्थी गणित, विज्ञान, किंवा इंग्रजीमध्ये सरासरी कामगिरी करतो, पण तो एखाद्या विशिष्ट कौशल्यात, जसं की कोडिंग, डिझाईन, वाचन, भाषणकला अप्रतिम असतो. परंतु गुणांच्या आधारित चाचणी पद्धतीमुळे तो शिक्षणात कमकुवत मानला जातो आणि त्याचं आत्मविश्वास कमी होतो. त्यामुळे शिक्षण संस्थांनी विविध कौशल्यांमध्ये विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य त्या दिशेने पोषण करणे गरजेचे आहे.

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना क्लासरूमच्या बाहेरचं शिक्षण देणं ही काळाची गरज आहे. यात live industry projects, 'skill bootcamps', 'real-world case studies', आणि 'peer-to-peer learning models' यांचा समावेश असावा. यामुळे विद्यार्थी 'book-smart' राहणार नाहीत, तर 'job-ready' होतील.

शिक्षण आणि उद्योग यामधील दरी भरून काढण्यासाठी स्थानिक कंपन्यांसोबत शैक्षणिक संस्थांनी भागीदारी करावी आणि 'campus to corporate' ट्रान्झिशन अधिक सुलभ करावा. खरोखरच, आजच्या काळात शिक्षण हे केवळ पाठांतरापुरते मर्यादित राहू नये.

सध्याच्या पद्धतीमध्ये अजूनही बराचसा भर किती पाठ आहे यावर दिला जातो, आणि किती समजलं किंवा किती उपयोगात आणता येईल याकडे दुर्लक्ष होत आहे. हे शिक्षणपद्धतीचं मोठं अपयश ठरत आहे. माझं स्वतःचं निरीक्षण असं आहे की, जर एखादी संकल्पना योग्य पद्धतीने समजावून सांगितली गेली, विशेषतः mind maps, visual notes, flow diagrams, 3D models, animations अशा माध्यमांतून शिकवण्यात आलं, तर ती माहिती खूप काळ लक्षात राहते आणि प्रत्यक्षात उपयोगातही येते. ही केवळ वैयक्तिक भावना नाही, तर Harvard University च्या 2023 च्या एका संशोधनानुसार, "visuo-conceptual learning techniques" वापरले गेले असता विद्यार्थ्यांचं retention rate ३०% पेक्षा जास्त वाढलेलं दिसून आलं.

भाग १

यामध्ये शिक्षकांचं योगदान महत्त्वाचं आहे. शिक्षकांनीही आता पारंपरिक "lecture-based" शिकवण्याच्या पद्धतीत बदल करून interactive, participatory आणि तंत्रज्ञानाधारित शिकवण्याकडे वळायला हवं. उदाहरणार्थ, South Korea आणि Finland यांसारख्या देशांमध्ये शिक्षक दर तासाला केवळ माहिती देत नाहीत, तर विद्यार्थ्यांना त्या माहितीचा स्वतः अनुभव घेता येईल अशा उपक्रमांमध्ये सहभागी करतात.

भारतातही "DIKSHA", "SWAYAM", आणि "e-PG Pathshala" सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा योग्य वापर करून तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण दिलं जाऊ शकतं. पण यासाठी आधी शिक्षकांना या प्रणालींचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. UNESCO-2024 Global Education Monitoring Report मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, भारतातील ६४% शिक्षकांनी अद्यापही डिजिटल शिकवणीच्या साधनांमध्ये पारंगत नसल्याचं मान्य केलं आहे.

पुढे, शिकवतानाचा दृष्टिकोनही बदलण्याची आवश्यकता आहे. सध्याची परीक्षा प्रणाली विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेऐवजी स्मरणशक्ती तपासत आहे. या ठिकाणी आपण Bloom's Taxonomy सारख्या आधुनिक शिक्षण सिद्धांतांचा अवलंब केला पाहिजे, जिथे विद्यार्थ्याला केवळ माहिती आठवण्याऐवजी त्याचं विश्लेषण, उपयोग, आणि निर्मिती करण्यास प्रवृत्त केलं जातं.

IIM Bangalore च्या एका अभ्यासानुसार, जे विद्यार्थी concept-based learning प्रणालीद्वारे शिकले, त्यांचं problem-solving ability सरासरी विद्यार्थ्यांपेक्षा ४०% जास्त विकसित झालं होतं. त्यामुळे शिक्षणात पाठांतराची शर्यत थांबवून समज आणि वापर ह्या दोन गोष्टी केंद्रस्थानी आणल्या गेल्या पाहिजेत.

या सर्व संकल्पनांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि शिक्षण विभाग यांचं समन्वयित सहकार्य गरजेचं आहे. शिक्षकांनी वर्षातून काही तास concept-building workshops घ्याव्यात, जिथे विद्यार्थ्यांना फक्त काय शिकायचं यावर नव्हे तर का शिकायचं आणि कसं शिकायचं यावर मार्गदर्शन दिलं जावं. विद्यार्थ्यांनी फक्त एकतर्फी शिकण्यापेक्षा, open discussions, Q&A sessions, simulations, role-play, case studies यामध्ये भाग घेतला पाहिजे.

--------------------

श्रिजीत राजश्री चेतक भोकरे
१२ वी (विज्ञान शाखा)
मॉडेल ज्युनिअर कॉलेज,
कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा.
9970591697
bhokareshrijeet@gmail.com

■ ■ ■

# मुसळधार पावसाचा विदर्भालाही तडाखा

■ महासागर प्रतिनिधी

**गडचिरोली/यवतमाळ/अकोला/बुलढाणा, दि. १९ :** राज्याच्या अनेक भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा विदर्भातील अनेक जिल्ह्यांनाही मोठा फटका बसला असून, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, बुलढाणा हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील १०० हून अधिक गावांचा उर्वरीत भागाशी संपर्क तुटला असून, एक तरूण वाहून गेला. बुलढाणा जिल्ह्याच्या पाच धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असून, शेकडो गावांना अलर्ट जारी करण्यात आला आहे. दुसरीकडे, अकोला जिल्ह्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून, ६० हजार हेक्टरमधील पिक पाण्याखाली आले आहे. अतिवृष्टीचा फटका बसलेल्या जिल्ह्यांमध्ये हजारावर घरांची पडझड झाली असून, मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.



गडचिरोली जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून, अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, जिल्ह्यातील १०० हून अधिक गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क पूर्णतः तुटला आहे. रस्ते, पुल, नाले आणि घाट मार्ग जलमय झाले असून वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

भामरागड तालुका पुन्हा एकदा मुख्य प्रवाहापासून वेगळा पडला आहे. भामरागड-हेमलकसा राष्ट्रीय महामार्गावरील पर्लकोटा नदीवरील पुलाचे काम अद्याप अपूर्ण असल्याने दरवर्षीप्रमाणेच यंदाही या भागातील संपर्क व्यवस्था कोसळली आहे.

भामरागड तालुका अजूनही अपूर्ण रस्ते, अधांतरी पूल आणि बकाल संपर्क व्यवस्थेचा बळी ठरत आहे. दरवर्षी पावसाळ्यात भामरागड मधील नागरिकांना बाहेरच्या जगाशी संपर्क तुटल्याचे अनुभवावे लागते. हेमलकसा-भामरागड महामार्गावरील पुलाचे काम गेल्या कित्येक वर्षापासून रखडले आहे.

### १९ वर्षीय तरुण वाहून गेला

भामरागड तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. याच दरम्यान, तालुक्यात एक दुर्दैवी घटना घडली आहे. कोडपे गावातील लालचंद कपिलसाय लकडा हा १९ वर्षीय तरुण खंडी नाला ओलांडत असताना पुराच्या पाण्यात वाहून गेला.

### तुकड्या तैनात

गडचिरोली जिल्ह्याच्या विविध भागांत पिकांचे नुकसान, घरांची पडझड आणि रस्त्यांची हानी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे.

जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन पथक सज्ज ठेवले असून, एसडीआरएफ, एनडीआरएफच्या तुकड्याही काही भागांत तैनात करण्यात आल्या आहेत. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील जीवनमान प्रभावित झाले असून, शाळा, कॉलेजेस, कार्यालये ओस पडल्याचे चित्र आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमिवर प्रशासन सतर्क आहे.

## यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीने पुराचा धोका

यवतमाळ जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. उमरखेड तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली असून, पैनगंगेच्या वाढत्या पातळीमुळे तालुक्यातील पळशी गावाला सोमवारी दुपारपासून पुराचा वेढा पडला आहे. सध्या पाणी उतरत असले तरी पुराचा धोका कायम आहे.

ईसापूर धरणाच्या वाढत्या विसर्गामुळे पैनगंगा नदी धोक्याच्या पातळीवर आहे. मागील तीन दिवसांपासून अखंड कोसळणाऱ्या पावसामुळे नदीकाठील गावांचा संपर्क तुटला असून शेतपिके मोठ्या प्रमाणावर पाण्याखाली गेली आहेत. सध्या ईसापुर धरणाचे १३ दरवाजे दीड मीटरने उघडण्यात आले असून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे.

त्यामुळे नदीकाठील गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संवेदनशील मानल्या जाणाऱ्या संगम चिंचोली, मालेगांव, देवसरी, पळशी या गावांना सर्वाधिक धोका असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### पळशी गाव जलमय

पळशी गावाला पुराचा वेढा पडला असून सध्या पाणी वाढतच आहे. गावातील शाळेच्या आवारासह खोलगट भागातील १० ते १५ घरांमध्ये पाणी शिरले आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून, रात्रीतून नदीचे पाणी आणखी वाढण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

प्रशासनाने तत्काळ गावातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची व्यवस्था केली आहे. दरम्यान आज दुपारपासून जिल्ह्यात पावसाचे थैमान पुन्हा सुरू झाले. यवतमाळसह अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळला. आज मंगळवारी सकाळी काही भागात पावसाने उसंत घेतली. मात्र धरणातील पाणी नदीमध्ये सोडण्यात येत असल्याने अनेक गावे अद्यापही पुराच्या छायेत आहेत.

### शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरू

एकीकडे अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले असताना नापिकीच्या भीतीने शेतकरी खचले आहेत. नापिकी, पिकांचे झालेले नुकसान आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे जिल्ह्यात २४ तासात तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. वणी तालुक्यात दोन तर आर्णी तालुक्यात एका शेतकऱ्याने जीवनयात्रा संपविल्याची घटना उघडकीस आली आहे.

वणी तालुक्यातील सैदाबाद येथील शेतकरी राजकुमार मारोती गोवारदिपे (५५) यांची नवरगाव येथे शेतजमीन आहे. त्यांनी राहत्या घरी विष प्राशन करून आत्महत्या केली. त्यांना उपचारासाठी तातडीने वणीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात मुलगा, सून व दोन नातवंडे असा परिवार आहे.

दरम्यान, या महिन्याच्या सुरूवातीलाही यवतमाळ जिल्ह्याला अतिवृष्टीचा तडाखा बसला होता. आता पुन्हा पावसाने थैमान घातल्याने शेतकरी चिंतातूर आहे.

## ६० हजार हेक्टरमधील पिकं पाण्यात, ३८९ घरांची पडझड

अकोला जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीचा मोठा फटका जिल्ह्याला बसला आहे. ३८९ घरांची पडझड झाली असून सुमारे ६० हजार हेक्टर पिकांचे नुकसान झाले. २६ जनावरांचा देखील मृत्यू झाला आहे. १० मंडळात अतिवृष्टी झाल्याची नोंद झाली. सोयाबीन, तूर, कापूस आदी पिके उद्ध्वस्त झाली आहेत.

जिल्ह्यात दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळला. त्यानंतर मंगळवारी पावसाने उसंत घेतली. १७ आणि १८ ऑगस्टला जिल्ह्यातील ५२ पैकी १० मंडळात अतिवृष्टी झाली. अकोला तालुक्यातील अकोला ६६.८८, घुसर ८२.८०, दहिहांडा ९९.८०, बोरगाव ८२.८०, पळसो ९८.५०, सांगळूद ८२.८०, कौलखेड ९०.८० मि.मी. मूर्तिजापूर तालुक्यातील निभा १२६.३०, माना ६७.३० आणि पातूर तालुक्यातील आलेगाव मंडळात ७४ मि.मी. पाऊस झाला. जिल्ह्यात १७ ऑगस्टला सरासरी ३८.६०, तर १८ ऑगस्टला ७.६० मि. मी. पाऊस पडला. या पावसामुळे अकोला तालुक्यात ४४, मूर्तिजापूर २३८, अकोट १२, तेल्हारा ९५ अशा एकूण ३८९ घरांची पडझड झाली आहे.

त्यामध्ये ३८१ घरांचे अंशतः, तर आठ घरांचे पूर्णतः नुकसान झाले. मूर्तिजापूर तालुक्यात सहा आणि पातूर तालुक्यात २० अशा एकूण २६ जनावरांचा मृत्यू झाला. पावसामुळे आस्टूल, पास्टूल, झरंडी, अंधारसांगवी, पांढूर्णा, खामखेड, चोंढी, कोठारी बु. व अगिखेडे गावाचे मार्ग बंद झाले.

मुसळधार पावसाचा शेतीला मोठा फटका बसला असून शेतकऱ्यांची अतोनात हानी झाली. अकोला तालुक्यातील १०२ गावातील १६ हजार ५८० हेक्टर, मूर्तिजापूर तालुक्यातील १३३ गावातील ३७ हजार ०९९ हेक्टर, पातूरच्या ३७ गावातील एक हजार ६५५ हेक्टर, बार्शीटाकळीच्या तीन गावातील १५ हेक्टर, तेल्हारा तालुक्याच्या ४१ गावातील दोन हजार ५०० हेक्टर आणि अकोट तालुक्यातील ४० गावातील एक हजार ४४० हेक्टर अशा एकूण जिल्ह्यातील ३५६ गावातील ५९ हेक्टर २८९ शेतजमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान, ६० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रातील पिके पाण्याखाली आल्याने शेतकरी संकटात सापडले असून, त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. नुकसानीचे पंचनामे करून शासनाने मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## महाभियोगाची मागणी चुकीची
## काँग्रेसकडून दिशाभूल

■ महासागर प्रतिनिधी



**नागपूर, दि. १९ :** महाभियोगची तयारी दाखवणे म्हणजे काँग्रेसची नौटंकी सुरू आहे. संपूर्ण विषयाचे विश्लेषण निवडणूक आयोगाने केले आहे. निवडणूक आयोगाच्या कार्य पद्धतीसह कार्यक्षमतेवर ज्या पद्धतीने आक्षेप घेतला जात आहे तो काही योग्य नाही, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, राहुल गांधी यांनी झोपेचे सोंगे घेतले आहे. त्यांना उठवण्याचा कितीही प्रयत्न करा ते उठणार नाही. निवडणूक आयोगावर बोलून आपला पक्ष वाचवण्याचे काम हे त्यांच्याकडून सुरू आहे.

बावनकुळे म्हणाले की, पश्चिम विदर्भातील वाशीम, यवतमाळ, अमरावती, बुलडाणा आणि अकोला जिल्ह्यातील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर आणि महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे.

४ लाख हेक्टरहून अधिक पिकांचे नुकसान झाले आहे. पंचनामे होतील परंतू काही ठिकाणी शेती खरडून निघाली आहे. काही ठिकाणी वित्तहानी झाली आहे, तातडीने जिल्हाधिकाऱ्यांच्या खात्यामध्ये आमचा जो आपत्ती व्यवस्थापनाचा निधी असतो तो विड्रॉल करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. ज्यांचे घर वाहून गेले, ज्यांना रेस्क्यू करावे लागले त्यांना तातडीची मदत करावी असे आदेश देण्यात आले आहेत.

### परिस्थितीवर मुख्यमंत्र्यांचे लक्ष

बावनकुळे म्हणाले की, राज्यातील जवळपास १५ जिल्ह्यामध्ये हवामान विभागाकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. एसडीआरएफ, एनडीआरएफसह आमच्या जिल्हा प्रशासन कलेक्टर यांची टीम संपूर्ण वेळ लक्ष देऊन आहे. सर्व विभागांनी त्यावर लक्ष ठेवले आहे.

### शाळा संचालकांची मालमत्ता जप्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार

शालार्थ आयडी घोटाळ्यात शिक्षकांचा काही दोष नाही, उलट यात बदमाशी करणाऱ्या शाळा संचालकांची मालमत्ता जप्त केली पाहिजे. या संदर्भात शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याशी या संपूर्ण प्रकरणाबद्दल चर्चा केली असल्याची माहिती बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना दिली.

शाळा संचालकांनी शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या आधी त्यांना प्रलोभन देत खोट्या पद्धतीने शालार्थ आयडी तयार करून त्यांची नियुक्ती केली आहे. अनेक शिक्षकांनी तर नोकरीसाठी कर्ज घेतले आहे. मात्र शाळा संचालकांनी गैरव्यवहार केले आहेत. त्यात शिक्षकांचा काहीही दोष नाही. शासन त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यासोबत चर्चा करून ठोस तोडगा काढला जाईल. बदमाशी करणाऱ्या शाळा संचालकांची मालमत्ता जप्त केली पाहिजे, याचा पुनरूच्चार बावनकुळे यांनी केला.

## बाप मुलाच्या धमाल नात्याची झलक 'आवशीचो घो'मध्ये!

लोकरंजन · सिनेरंग

सध्या सर्वत्र चर्चेत असलेला आणि प्रेक्षकांच्या प्रचंड उत्सुकतेचा विषय ठरलेला दशावतार हा मराठी चित्रपट लवकरच म्हणजेच १२ सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. झी स्टुडिओज प्रस्तुत, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊस निर्मित या भव्य चित्रपटात अनेक दिग्गज कलाकारांची मांदियाळी आहे.

दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, विजय केंकरे, सुनील तावडे, रवी काळे, सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर आणि अभिनय बेर्डे यांचा अप्रतिम अभिनय या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.



पोस्टर आणि टीझरने प्रेक्षकांमध्ये आधीच प्रचंड उत्सुकता निर्माण केली असतानाच, आता या चित्रपटातील पहिलं गाणं आवशीचो घो नुकतंच प्रदर्शित झालं असून या आगळ्यावेगळ्या गाण्याने कोकणच्या मातीचा गंध आणला आहे.

अनेकांना शिवी वाटणारा हा शब्द खरंतर लाडाने वापरला जाणारा शब्द आहे. मालवणी भाषेत आईला प्रेमाने आवशी आणि नवऱ्याला घो असं म्हणतात. म्हणूनच आईच्या नवऱ्याला म्हणजेच वडीलांना प्रेमाने आवशीचो घो म्हणायची पद्धत आहे. दशावतार चित्रपटातलं हे गाणं सुद्धा बाप आणि मुलाच्या अनोख्या नात्याबद्दल आहे.

दिलीप प्रभावळकर आणि सिद्धार्थ मेनन यांच्यावर चित्रित करण्यात आलेलं हे गाणं, वडील आणि मुलामधील नात्याचं एक अजब रसायन दाखवणारं आहे.

हे गाणं वर वर पाहता मिश्किल किंवा गंमतीशीर वाटत असलं तरी ते गाणं बाप - मुलाच्या नात्याचं सारच मांडतं. विशेष म्हणजे यात कधी कधी मुलगा वडिलांची जबाबदारी घेणारा ह्यवडीलह्र बनतो आणि वडील त्याचे ह्यमूलह्र होतात. बाप मुलाच्या नात्याचं हळूवारपण उलगडणारं हे गाणं गुरु ठाकूरच्या समृद्ध लेखणीतून उतरलं असून, संगीत दिग्दर्शक ए व्ही प्रफुल्लचंद्र यांनी संगीतबद्ध केलं आहे. तर ओंकारस्वरुप याने ते गायलं आहे.

'दशावतार'चा टीझर पाहूनच प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. आता आवशीचो घो गाण्याने या चित्रपटातील भावनिक बाजूही उलगडायला सुरुवात झाली आहे. धमाल आणि हृदयस्पर्शी भावनांचं हे सुंदर मिश्रण प्रेक्षकांना नक्की भावेल, अशी आशा आहे. ■ ■

## अरण्यमध्ये उलगडणार जंगल, भावना आणि संघर्षाची कहाणी

एस एस स्टुडिओ निर्मित अरण्य या चित्रपटाचे दमदार मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे. शरद पाटील आणि अंजली पाटील यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक अमोल दिगांबर करंबे आहेत. हार्दिक जोशी, वीणा जगताप, हितीका पाटील, विजय निकम, सुरेश विश्वकर्मा आणि चेतन चावडा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचा भव्य प्रवास १९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




मोशन पोस्टरमध्ये जंगलाची दाट हिरवाई, धुक्याने व्यापलेले दृश्य आणि त्यात लपलेला गूढपणा अंगावर काटा आणणारा आहे. यातील हार्दिक जोशी चा लूक विशेष लक्ष वेधून घेतो. डोळ्यांमध्ये प्रखर राग आणि निर्धार, चेहरा कपड्याने झाकलेला आणि पार्श्वभूमीला जंगलातील गूढ वातावरण. त्याच्या नजरेतून एक भयंकर संघर्ष आणि दडलेली कहाणी जाणवते. अरण्य ही फक्त जंगलाची कथा नाही, तर ही मानवी अस्तित्व, निसर्गाशी असलेलं आपलं नातं आणि संघर्षाच्या काठावर उभ्या राहिलेल्या माणसाची कहाणी आहे. या अरण्यात फक्त झाडं, पाने किंवा वेली नाहीत, तर येथे श्वास घेणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या मागे एक इतिहास आहे. कधी शांत, कधी रक्तरंजित. मला हवं होतं की प्रेक्षकांनी या जंगलाचा गंध, त्यातील ओलसरपणा, आणि त्याच्या प्रत्येक सावलीतील रहस्य अनुभवावं. अरण्य प्रेक्षकांना आतून जगायला लावेल. ■ ■

## टँगो मल्हार चित्रपटातून उद्योजिका, शास्त्रज्ञाचे मराठी चित्रपसृष्टीत पदार्पण




चित्रपट या माध्यमाची जादू काही औरच आहे. कोणत्याही क्षेत्रात काम केलं, तरी स्वतः चित्रपट करण्याची उर्मी काहींना स्वस्थ बसू देत नाही. संगणक शास्त्रज्ञ तसेच उद्योजिका असलेल्या साया दाते यांनी आगामी 'टँगो मल्हार' या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉन्च करण्यात आले असून येत्या १९ सप्टेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

₹टँगो मल्हार₹ या चित्रपटाची निर्मिती ॲंगलेट्स अँड आयलेट्स प्रॉडक्शन या निर्मिती संस्थे अंतर्गत करण्यात आली असून साया दाते या निर्मात्या आहेत. टँगो मल्हार या चित्रपटात एका रिक्षा चालकाची गोष्ट उलगडण्यात आली आहे.

काहीतरी नवीन करू पाहणाऱ्या तरुण अशा मल्हारला अचानकपणे टँगो या अर्जेंटिनाच्या नृत्य प्रकाराचा शोध लागतो आणि त्याची आवड निर्माण होते. या नृत्य प्रकारामुळे त्याच्या आयुष्यात काय काय गोष्टी रंजकपणे घडत जातात या कथासूत्रावर 'टँगो मल्हार' हा चित्रपट बेतला आहे. चित्रपटाच लेखन साया दाते, मनीष धमार्नी यांनी केले आहे. सुमेध तरडे, ओंकार आठवले यांनी छायांकन, क्षमा पाडळकर यांनी संकलन, तुषार कांगारकर यांनी ध्वनी आरेखन, शार्दूल बापट, उदयन कानडे यांनी संगीत आणि पार्श्वसंगीत केलं आहे. चित्रपटात नितेश कांबळे, कीर्ति विश्वनाथन, सीमा वर्तक, अक्षय गायकवाड, मनीष धमार्नी, मनीषा महालदार, संदेश सूर्यवंशी, पंकज सोनावणे या नवोदित कलाकरांचा अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## बसला भीषण आग; 30 वर प्रवासी सुखरूप



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :** पुणे शहरात मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नऱ्हे परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या एका बसला भीषण आग लागली. या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे.

बसमधील ३० वर सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली असून सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली. सोमवारी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

## काँग्रेस नेते वडेट्टीवार यांना मातृशोक

■ महासागर प्रतिनिधी



**नागपूर, दि. १९ :** राज्याचे माजी मंत्री आणि काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या मातोश्री कमलाबाई नामदेवराव वडेट्टीवार यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. वयाच्या ९४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. नागपूर येथील निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली.

कमलाबाई यांच्या निधनाने वडेट्टीवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कमलाबाई वडेट्टीवार यांच्या निधनाची बातमी समजताच काँग्रेस पक्षातील नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. राज्यभरातून कार्यकर्त्यांकडूनही संवेदना व्यक्त होत आहेत.

## मेळघाटात वाघाच्या हल्ल्यात युवक ठार

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १९ :** जंगलात गुरांना चराईसाठी घेऊन गेलेल्या एका युवकावर वाघाने केलेल्या हल्लूयात त्याचा मृत्यू झाल्याची घटना मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील कुलंगणा खुर्द या गावाजवळील जंगलात उघडकीस आली. आपल्या सहकाऱ्यावर वाघाने हल्ला केल्याचे कळताच दुसऱ्या युवकाने पळ काढून आपला जीव वाचवला. रात्रभर तो एका शेतात लपून होता.

प्रवीण सुखराम बेलसरे (१७), रा. कुलंगणा, ता. चिखलदरा, असे वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या मृत युवकाचे नाव आहे. त्याचा मित्र गोविंद गोपाळ कासदेकर (१७), रा. कुलंगणा, ता. चिखलदरा, हा या घटनेत बचावला आहे. हे दोघेही युवक चराईसाठी गुरांना घेऊन जंगलात गेले होते. मोझरी येथे गुरांना नातेवाईकांकडे बांधून ठेवल्यानंतर ते काल श्रावणातील शेवटचा सोमवार असल्याने जंगलातील डोंगरावरील महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी गेले होते. रात्री उशिरापर्यंत दोघेही न परतल्याने त्याचे कुटुंबीय चिंतेत होते. गावकऱ्यांनी दोघांचाही शोध सुरू केला होता.

दरम्यान, प्रवीण सुखराम बेलसरे याचा मृतदेह जंगलात आढळून आला. त्याचा एक पाय तुटलेल्या स्थितीत होता.मंदिरातून दर्शन करून परत येत असताना, अचानक पाऊस वाढल्याने नदीची पाण्याची पातळी वाढली आणि दोघेही नदीच्या काठावर थांबले. तोवर संध्याकाळ झाली.

पाण्याची पातळी कमी होत असल्याचे पाहून दोन्ही मित्र अंधारात त्यांच्या गावाकडे जाऊ लागले, तेव्हा एका वाघाने प्रवीणवर मागून हल्ला केला, ते पाहून त्याचा मित्र गोविंद घाबरून तेथून पळून गेला आणि रात्रभर एका शेतात लपून राहिला. दुसऱ्या दिवशी गोविंद स्वतः आला आणि गावकऱ्यांना घटनाक्रम सांगितला.

गुरे चारल्यानंतर, आम्ही महादेवाचे दर्शन घेऊन परतत होतो, तेव्हा वाघाने माझ्या मित्रावर हल्ला केला, मी कसा तरी माझा जीव वाचवला आणि तेथून पळून गेलो, परंतु माझा मित्र पूर्णपणे वाघाच्या तावडीत होता. त्याला वाचवणे माझ्यासाठी शक्य नव्हते, म्हणून मी माझा जीव वाचवण्यासाठी पळून जाणेच योग्य मानले, असे गोविंद याने गावकऱ्यांना सांगितले. या घटनेने गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## ५ लाखांचा नंदी बैल.. आहे का हिंमत?

■ महासागर प्रतिनिधी

**वर्धा, दि. १९ :** विदर्भात तान्हा पोळा सर्वत्र उत्साहात साजरा केला जातो. मोठ्या पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे पाडव्याला बाल गोपाल साजरा करीत असलेला हा सण यावर्षी २३ ऑगस्टला येत आहे. वर्धा जिल्ह्यात या सणास मोठी परंपरा आहे. सिंदी रेल्वे येथील तान्हा पोळा विदर्भात सुप्रसिद्ध आहे. त्यामुळे सिंदीची ओळख आता पोळा सिटी अशी झाली असून येथील मोठमोठे लाकडी नंदी बघण्यास चांगलीच गर्दी उसळते.

आता एक कारागीर सर्वात मोठा नंदी तयार करण्याच्या विक्रमास सज्ज झाले आहे. ७ फूट उंच व ८ फूट रुंद अशा आकाराचा हा नंदी राहणार आहे. त्याची घडण आता अंतिम टप्प्यात आली असून तो येत्या पोळ्यास हजर होईल. आष्टी शहीद येथील रवींद्र मोकद्दम हे कलावंत नंदी तयार करत असून, एक महिन्यापासून ते एकटेच हा नंदी तयार करण्याच्या कार्यात मग्न आहेत. हा राज्यातील सर्वात मोठा लाकडी नंदी बैल ठरणार असल्याचा दावा ते करतात.

ते म्हणतात की आजवर मीच तीन मोठे नंदी तयार करून दिले आहेत. पुलगाव, अल्लीपूर व टाकळघाट नागपूर येथे ते विकल्या गेले. सात वर्षांपूर्वी २ लाख रुपयास तो नंदी विकल्या गेला. ९/९ /१९९९ रोजी आलेल्या पोळ्यास सर्वात पहिला नंदी मी तयार करून दिला होता. त्या आकाराचे नंदी कुठेच नसल्याचे चर्चा झाली. सिंदीच्या प्रसिद्ध पोळ्यात पण मी केलेल्या आकारापेक्षा मोठा नंदी नव्हता. त्यामुळे आज तयार होत असलेला नंदी हाच सर्वात मोठा ठरणार, अशी खात्री मोकद्दम देतात.



नंदी तयार करण्याच्या कामास अखेरचा हात फिरवला जात असून घसाई व नंतर पॉलिश होईल. आष्टीच्या तान्हा पोळ्यात तो मांडणार. पण त्यापूर्वी तो कुणी विकत घेण्यास तयार असल्यास मी विकू शकतो. त्याची किंमत ५ लाख रुपये ठेवली आहे, असे मोकद्दम सांगतात.

सर्वात मोठा नंदी तयार करण्याचा माझा संकल्प होता. अनेक वर्ष झाली लाकडी नंदी तयार केलाच नव्हता. म्हणून यावर्षी संकल्प पक्का केला. विकल्या गेलाच पाहिजे असा हट्ट नाही. राहील माझ्याच कडे. आतून पोकळ राहणार असल्याने मंदिराची दानपेटी म्हणून पण तो कामास येवू शकतो. कुणी हिम्मतबाज असेल तर नंदी विकत देणार, असे एक प्रकारे आव्हानच मोकद्दम यांनी दिले.

यासाठी अस्सल सागाचे ८० हजार रुपयाचे लाकूड विकत घेण्यात आले. नंदी तयार झाल्यावर त्याचे वजन १४० किलोच्या दरम्यान असून, कोण जिगरबाज हा नंदी विकत घेणार? याची प्रतिक्षा लागून राहिली आहे.